रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १७०
www.ramprahar.com


# राम प्रहर

रविवार, ५ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

जेएनपीएचा कंटेनर हाताळणीत विक्रम/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
रायफल चॅम्पियनशिपमध्ये मयुरी पवारला आठ पदके/८

## राज्यातील वातावरणात सातत्याने होतोय बदल



**पुणे :** राज्यात कुठे थंडीचा कडाका जाणवत आहे, तर कुठे ढगाळ वातावरण आहे. दरम्यान, राज्यात किमान तापमान हळूहळू घसरत असून थंडीत वाढ होत असताना दुपारी मात्र तापमान वाढत असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली. पहाटेच्या किमान तापमानात घसरण होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान हे सरासरी इतके, तर भागपरत्वे बऱ्याच ठिकाणी अर्ध्या डिग्रीपासून ते साडे तीन डिग्रीपर्यंत खालावले आहे. त्यामुळे मुंबईसह कोकणात आणि उर्वरित महाराष्ट्रातही या आठवड्यात हळूहळू थंडीत वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. याउलट दुपारी ३चे कमाल तापमान मात्र भागपरत्वे सरासरीपेक्षा एक डिग्रीपासून सात डिग्रीपर्यंत वाढत आहे. त्यामुळे दिवसा ऊबदारपणा, तर रात्री थंडी जाणवते. दरम्यान, सध्या पावसाची शक्यता नाही, असेही असल्याची खुळे यांनी सांगितले.

### बीड सरपंच हत्या प्रकरणात मोठी घडामोड

# तीन आरोपींना सीआयडी कोठडी

**पुणे, बीड : प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा अटक केली. आरोपींना शनिवारी (दि. ४) केज येथील न्यायालयात हजर केल्यानंतर कोर्टाने तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे.

सरपंच देशमुख यांची हत्या करून सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे हे आरोपी फरार झाले होते, तर आरोपींना देशमुख यांच्याविषयी माहिती देणारा सिद्धार्थ सोनवणे हादेखील फरार होता.



मुख्य आरोपी सुदर्शनसह सुधीरच्या मुसक्या एसआयटीच्या पथकाने पुण्यातील बालेवाडीत आवळल्या, तर हत्येच्या दिवशी सरपंचाचा ठावठिकाणा सांगितल्याच्या संशयाखाली कल्याणमधून सिद्धार्थ सोनवणेला ताब्यात घेतले आहे. सिद्धार्थ हा मस्साजोगचाच रहिवासी आहे. सरपंचाची हत्या झाल्यानंतर तो गावातच होता तसेच अंत्यविधीलादेखील उपस्थित होता.

मुख्य आरोपींना मदत करणाऱ्या डॉ. संभाजी वायभसे यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याच चौकशीत या आरोपींचा ठावठिकाणा कळाल्याचे सांगण्यात येत आहे.

सरकारी वकिलांनी आज बाजू मांडताना म्हटले की, या आरोपींकडून दहशत माजवून खंडणी मागितली जात असल्याने या भागात नवीन उद्योग येत नाहीत तसेच आरोपींकडून संघटितपणे गुन्हेगारी सुरू आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकिलांकडून करण्यात आली. ही विनंती मान्य करत कोर्टाने आरोपींना १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात यापूर्वी चार आरोपींना अटक करण्यात आली होती. यामध्ये विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले व महेश केदार यांचा समावेश होता, तर आरोपी सुदर्शन चंद्रभान घुले, कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे हे फरार होते. या आरोपींना पकडण्यासाठी प्रसिद्धीपत्रक जारी करत फरार घोषित करण्यात आले होते. त्यानंतर सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना अटक करण्यात आली आहे, तर कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे.



## यंदाही भव्य स्वरूपात नमो चषक स्पर्धा रंगणार

### मुख्य आयोजक परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मागील स्पर्धेप्रमाणे यंदाही भव्य स्वरूपात विविध क्रीडा, सांस्कृतिक महोत्सव अर्थात नमो चषक स्पर्धेचे आयोजन जानेवारी महिन्याच्या अंतिम आठवड्यात करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने मुख्य आयोजक परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पहिली नियोजन बैठक झाली.



उलवे नोडमध्ये झालेल्या या बैठकीस टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, भार्गव ठाकूर, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, सूर्यकांत ठाकूर, विनोद नाईक, किशोर पाटील, दिनेश खानावकर, अभिषेक भोपी, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, मयूर कदम, विवेक होन, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, निलेश खारकर, अक्षय सिंग, विश्वनाथ पाटील, प्रवीण खुटारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी स्पर्धेचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांनी विविध स्पर्धा समितीच्या पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या. त्यांनी पुढे सांगितले की, सीएम चषक, त्यानंतर मागील वर्षी नमो चषक स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि खेळाडूंना वाव देणाऱ्या ठरल्या. नमो चषक २०२४ स्पर्धा राज्यातील प्रत्येक तालुक्यात झाली. त्या स्पर्धेत पनवेल विधानसभा मतदारसंघात एक लाख १३ हजार २७८ स्पर्धकांनी सहभाग घेऊन पनवेलने महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकाविला होता.

मागील महोत्सवात नमो खारघर मॅरेथॉन, नमो खारघर हिल ट्रेकिंग, नमो सायक्लोथॉन, दिवस रात्र टेनिस क्रिकेट, चित्रकला, वक्तृत्व, फुटबॉल, कुस्ती, कबड्डी, बुद्धीबळ, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, ज्युडो, किक बॉक्सिंग, कॅरम, तायक्वांदो, खो-खो, रस्सीखेच, रांगोळी, गायन, नृत्य अशा २१ प्रकारात स्पर्धा झाल्या. **(पान २ वर..)**

## लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान, गणित आणि कलाविषयक प्रदर्शन

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये शनिवारी (दि. ४) विज्ञान, गणित आणि कला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशील आणि बौद्धिक कौशल्यांचे दर्शन घडले. प्रदर्शनाचे उद्घाटन स्कूलचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

प्रदर्शनाला वेस्टर्न हिल्स स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. वसा शिव प्रकाश, न्यू होरायझन स्कूलच्या मुख्याध्यापिका अमिता दत्ता, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, हेड क्लार्क श्री. गुजर यांच्यासह पालक उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिक्षणातील आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि सर्जनशीलतेचे महत्त्व आपल्या भाषणात सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, समन्वयिका रूहल दुबे, अर्चना माथुर तसेच सर्व शिक्षकांनी या प्रदर्शनास उपस्थित मान्यवर आणि पालकांचे आभार मानले तसेच विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## गवळी दाम्पत्याला न्यायालयीन कोठडी

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणमध्ये १२ वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या विशाल गवळीसह पत्नी साक्षीची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे.



या दोघांना शनिवारी (दि. ४) कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. कोर्टाने या दोन्ही आरोपींना १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

गवळी दाम्पत्याच्या दोन दिवसांच्या पोलीस कोठडीची मुदत शनिवारी संपल्याने सकाळीच पोलिसांनी दोघांना कडेकोट बंदोबस्तात कल्याण न्यायालयात हजर केले होते. कोर्टाने दोन्ही आरोपींना १८ जानेवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## निवडक

### तामिळनाडूमध्ये फटाका कारखान्यात स्फोट; सहा जण ठार, अनेक जखमी

**विरुधूनगर :** तामिळनाडूमध्ये शनिवारी (दि. ४) एका फटाक्याचा कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात सहा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, तर ३०हून अधिक जखमी झाले आहेत. ही दुर्घटना तामिळनाडू जिल्ह्यातील विरुधूनगर जिल्ह्यात घडली. त्यानंतर घटनास्थळावर मदत आणि बचावकार्य सुरू झाले. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

### लष्कराचे वाहन दरीत कोसळून चार जवान शहीद, दोघे जखमी

**बांदीपोरा :** जम्मू- काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यात शनिवारी (दि. ४) लष्कराचे वाहन खोल दरीत कोसळून चार जवान शहीद, तर दोन जण गंभीर जखमी झाले. एसके पायीन भागाजवळ एका वळणावर चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. जखमी जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चार दिवसांपूर्वी म्हणजे ३१ डिसेंबर २०२४ रोजी पूंछ जिल्ह्यातील मेंढारमधील एलओसीजवळील बलनोई भागात लष्कराच्या वाहनाला अपघात झाला होता. त्यात पाच जवानांनी आपला जीव गमावला होता.

## हभप पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे निधन



**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रख्यात कीर्तनकार पुरुषोत्तम उर्फ बापू पाटील (धाटावकर) महाराज यांचे शनिवारी (दि. ४) पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी वयाच्या ७२व्या वर्षी धाटाव येथील राहत्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने जिल्ह्यातील वारकरी सांप्रदायावर शोककळा पसरली आहे.

पुरुषोत्तम महाराज पाटील यांचा जन्म १ ऑगस्ट १९५३ रोजी वडखळजवळ डोलवी (पेण) येथे झाला. कामानिमित्त ते धाटाव येथे आले असता त्यांनी सुदर्शन केमिकल लि. या कारखान्यात अनेक वर्षे सेवा केली. गुरूवर्य नामदेवबाबा डोलवीकर यांचा हरिभक्त पारायणाचा वारसा जपत त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांसाठी प्रबोधनाला सुरुवात केली. त्यांना आवडीने बापू या नावाने संबोधले जात होते.

पुरुषोत्तम महाराजांचा कीर्तन, भारूडे, गवळणी व रामायण कथा यासह ज्ञानेश्वरी ग्रंथाचा गाढा अभ्यास होता. त्यांना रायगड भूषण पुरस्कारासह इतर संस्थांच्या माध्यमातून धार्मिक कार्य आणि प्रबोधन केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी डोलवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी मंत्री आदिती तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह रोहा, पेण तालुक्यातील स्थानिक नेते, पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमचा आधारवड हरपला, अशा भावना या वेळी अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केल्या.

## जालन्याहून रायगडात येणाऱ्या सहलीच्या विद्यार्थ्यांना मळमळ

### पोलादपूरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची सहल आंबेनळी घाटातून पोलादपूरकडे येत असताना बसमधील १८ विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक ढासळली. त्यांना पोलादपूरच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. जालना जिल्ह्याच्या जाफराबाद तालुक्यातील न्यू हायस्कूल वरूळ वाटवणचे हे विद्यार्थी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.





शैक्षणिक सहलीची बस जालन्याहून पुढे सिद्धटेक, बारामती, जेजुरी, मोरगाव, नारायणपूर, महाबळेश्वरमार्गे पोलादपूरच्या दिशेने निघाली. तत्पूर्वी विद्यार्थ्यांनी महाबळेश्वर येथे तेलकट पदार्थ खाल्ले तसेच स्ट्रींग नावाचे शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये आवडते असलेले पेय प्यायले. आंबेनळी घाटात गारवा असल्याने सर्व खिडक्या बंद करून प्रवास केल्याने गुदमरल्यासारखी भावना होऊन १८ विद्यार्थ्यांना मळमळ झाली. पोलादपूर येथे येताच अस्वस्थ वाटणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयामध्ये साधारणपणे शुक्रवारी (दि. ३) रात्री १० वाजण्याच्या सुमारास दाखल करण्यात आले.

या वेळी महाड पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे, पोलादपूरचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, महाड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शांतनू डोईफोडे, डॉ. अनिल काकड, बालरोगतज्ज्ञ डॉ. कुल्हे, डॉ. राजेश शिंदे तसेच पोलादपूर तहसील कार्यालयातील काही कर्मचारी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांवरील उपचारांना प्राधान्य दिले.

गेल्या वर्षीदेखील पोलादपूर येथील कॅ. विक्रमराव मोरे सभागृहालगत सहलीच्या विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे स्ट्रींग पेय प्राशन केल्याने अस्वस्थ वाटू लागले होते. त्यांनाही ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, पोलादपूर ग्रामीण रुग्णालयातील डॉ. भाग्यरेखा पाटील यांची बदली झाल्यानंतर अलिबागचे डॉ. पाटील हे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक म्हणून काम पाहतात. ते रात्री येथे नसल्याने महाड येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. शांतनू डोईफोडे हे वीर रेल्वे स्टेशनसमोरील भीषण अपघातानंतर महाड ग्रामीण रुग्णालयामध्ये आलेल्या जखमींवर उपचार करून तसेच मृतदेहांची उत्तरीय तपासणी करून रात्री पुन्हा पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात विद्यार्थ्यांवर उपचारासाठी उपस्थित राहिले होते. पोलादपूरचे पद भरण्याची गरज यातून अधोरेखित झाले.

## अरविंद केजरीवालांना प्रवेश वर्मा देणार आव्हान!

### दिल्लीत भाजपची पहिली यादी जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने आपली पहिली यादी जाहीर झाली आहे. या यादीत भाजपने २९ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.



दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात भाजपने प्रवेश साहिब सिंह वर्मा यांना तिकीट दिले आहे, तर विद्यमान मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात रमेश बिधुरी यांना मैदानात उतरवण्यात आले आहे.

भाजपने २९ जागांसाठी ज्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत, त्यापैकी दोन महिला आहेत. रेखा गुप्ता यांना शालीमार बागमधून उमेदवारी देण्यात आली असून सीमापुरी अनुसूचित जाती मतदारसंघातून कुमारी रिंकू यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## पर्यावरण वाचवण्याचा संदेश देत तरुणांची पदयात्रा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उत्तर प्रदेशातील चार तरुणांनी ११ देशांमध्ये पायी यात्रा करत तब्बल ४.४८ लाख किलोमीटर इतका प्रवास करून त्यांनी गुजरातमार्गे पालघर, ठाणे, मुंबई येथून शनिवारी (दि. ४) रायगड जिल्ह्यात प्रवेश केला. त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन या यात्रेची माहिती त्यांना दिली. पर्यावरण वाचवण्याचा वसा घेतलेल्या या तरुणांना ५.५ लाख किलोमीटरचा पल्ला गाठायचा आहे. या अंतर्गत पाच दिवस रायगडवासीयांना पर्यावरण वाचवण्याचा संदेश देऊन हे ध्येयवादी तरुण पुढील प्रवास करणार आहेत.



२००१पासून उत्तर प्रदेशातील जितेंद्र प्रताप, महेंद्र प्रताप, गोविंदा नंद आणि निश्चल मौर्य हे चार तरुण पायपीट करून जगभरातील नागरिकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी निघाले आहेत. त्यांची टीम आता २० सदस्यांपर्यंत पोहचली आहे. ही टीम सध्या महाराष्ट्राच्या विविध भागातून पदभ्रमण करत आहे. ५.५ लाख किमी पायी चालून लोकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्याच्या भीमकार्यात जराही खंड पडू द्यायचा नाही, असा मनोदय केल्याचे त्यांनी सांगितले.

**११ देशांमध्ये चार लाख किमी प्रवास; रायगडात आगमन**

गुरू अवध बिहारी यांनी १९८०पासून उत्तर प्रदेशातून सुरू केलेल्या पदयात्रेच्या माध्यमातून या तरुणांनी भारतात ६०० ठिकाणी १४.५० कोटी झाडे लावली आहेत. पर्यावरणाचे रक्षण करा, झाडे लावा, पृथ्वी वाचवा, नद्यांचे संरक्षण करा, मुली वाचवा-मुली शिकवा, रस्त्याची सुरक्षा, स्वच्छ भारत मिशन असा त्यांच्या जनजागृतीचा उद्देश आहे.

१९८०मध्ये उत्तर प्रदेशात आलेल्या महापुरात या तरुणांच्या गुरूंना वडाच्या वृक्षाने आधार देऊन वाचवले होते. तेव्हापासून वृक्ष लागवड आणि पर्यावरण रक्षणाच्या प्रचारार्थ त्यांनी जगभरात पायी यात्रेला सुरुवात केली. त्यांच्या आवाहनाला साद देत हे तरुण ही यात्रा पुढे घेऊन जाणार आहेत. या तरुणांनी ११ देशांचा दौरा केला आहे.

## उरणच्या सोनारी येथे टाकीची सफाई करताना दोघांचा मृत्यू

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील सोनारी येथे एका घराच्या स्वच्छतागृहाच्या टाकीच्या सफाईचे काम करताना गुदमरून दोन जणांचा मृत्यू झाल्याची विदारक घटना घडली. सक्शन पंप वाहनाचा चालक विकास टाक आणि क्लीनर यश जैस्वाल अशी मयत व्यक्तींची नावे आहेत.

सोनारी गावातील काशिनाथ तांडेल यांच्या स्वच्छतागृहाच्या टाकीची शुक्रवारी (दि. ३) साफसफाई सुरू होती. त्या वेळी टाकीत काम करणाऱ्या कामगाराला गुदमरल्यासारखे झाले. त्यामुळे त्याने जवळच उभ्या असलेल्या मैला वाहून नेणाऱ्या सक्शन पंप वाहनाचा क्लीनर यश जैस्वाल याला मदतीसाठी आवाज दिला. क्लीनर यशने कामगाराला हात देऊन बाहेर काढले, मात्र या वेळी स्वतः क्लीनर यश हा टाकीत पडला. त्याला मदत करण्यासाठी वाहनचालक विकास टाक याने हात दिला असता त्याचाही तोल जाऊन तो टाकीत पडला. अशा प्रकारे चालक व क्लीनर दोघेही टाकीत पडले.

टाकीतील उग्र दर्पामुळे चालक विकास टाक (वय ३५) आणि क्लीनर यश जैस्वाल (वय २७) या दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. याबाबत न्हावा शेवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

निवडक

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती



**रोहे :** तालुक्यातील एम.बी मोरे कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथे ३ जाने २०२५ रोजी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्रा. माधुरी जाधव, प्रा.दर्शना शिंदे, ग्रंथपाल निर्मला थोरात आणि विद्यार्थिनींनी यांनी प्रतिमेचे पूजन करून सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले. या वेळी प्रा. योगिता नेहेते, प्रा.अक्षता ठाकूर, प्रा.ऋतुजा कांबळे, विद्यार्थिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## टीएमसी कॉलेजमध्ये मार्गदर्शन शिबिर

**माणगाव :** टीएमसी कॉलेजमध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले



यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी मार्गदर्शन शिबीर व सत्कार समारंभ झाला. या वेळी उपनगराध्यक्षा व बांधकाम विभाग सभापती हर्षदा सुमित काळे, नगरसेविका तसेच महिला व बालविकास सभापती सुविधा संतोष खैरे, सुवर्णा जाधव, कॉलेजचे प्राध्यापक मोरे सर तसेच कॉलेज विद्यार्थी, विद्यार्थीनी वर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी उद्योग क्षेत्रातील सात महिलांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. रायगड इन्स्टिट्यूट ऑफ आय.टि.माणगावचे डॉ. अजय मोरे, संचालिका अंकिता अजय मोरे यांची या क्रार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

## खारपाडा येथे पुस्तक वाचन स्पर्धा



**पेण :** वाचन संकल्प महाराष्ट्राचा वाचन संस्कृती जपण्यासाठी या संकल्पनेतून विद्यार्थ्यांची पुस्तक वाचन स्पर्धा कै. मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय ग्रंथालय खारपाडा येथे झाली. या स्पर्धेसाठी शिक्षक सेल पेण तालुका अध्यक्ष नथुराम म्हात्रे परीक्षक म्हणून त्यांनी काम केले. या वेळी पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा कै. मोरेश्वर भगत सार्वजनिक वाचनालय ग्रंथालय अध्यक्ष दयानंद भगत, दुष्मी खारपाडा माजी सरपंच रश्मी भगत, उपाध्यक्ष रमेश घरत ग्रंथालय सदस्य कुंदा ठाकूर, शैक्षणिक संस्थेच्या सदस्य अनिता भगत, सीता पवार, राजश्री पाटील हे उपस्थित होते. या वेळी पुस्तक वाचन स्पर्धेमध्ये १५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या वेळी विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. भाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष दयानंद भगत यांनी अभिनंदन केले.

# जेएनपीएचा कंटेनर हाताळणीत विक्रम

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने वर्ष २०२४मध्ये नवीन उंची गाठली, कंटेनर थ्रूपुटमध्ये विक्रमी ७.०५ दशलक्ष टीईयूएस साध्य केले, अपवादात्मक प्रगतीचे वर्ष दर्शवते. मागील कॅलेंडर वर्ष २०२३च्या तुलनेत हे १०.९९ टक्के जास्त आहे. पंचांग वर्ष २०२३ मध्ये, जनेप प्राधिकरणाने ६.३५ दशलक्ष टीईयूएस कंटेनर हाताळणी झाली.



हितधारकांच्या बैठकीत केक कापण्याचा सोहळा झाल्यानंतर या कामगिरीची दखल घेत जनेप प्राधिकरणाने २०२४ मध्ये ७.०५ दशलक्ष टीईयूएस कंटेनर थ्रूपुट साध्य केले आहे. १० पेक्षा जास्त दशलक्ष टीईयूएस हाताळण्याची क्षमता साध्य करून या महिन्यात भारताचे सर्वात मोठे बंदर बनण्यासाठी सज्ज आहोत. ही कामगिरी कर्मचारी, भागधारक आणि टर्मिनल ऑपरेटर्स यांच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. जसजसे आपण वाढत जात आहोत, तसतसे आम्ही परिचालन उत्कृष्टता राखण्यावर आणि भारताच्या जागतिक व्यापार नेतृत्वात योगदान देण्यावर लक्ष केंद्रित करीत असल्याचे जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी म्हटले आहे.

मागील आर्थिक वर्षात याच कालावधीत ४,७९६ रॅक आणि ७६६,४०१ टीईयूएस हाताळले होते. जनेप प्राधिकरणामधील हितधारकांच्या बैठकीत बंदर आणि लॉजिस्टिक इकोसिस्टमचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध सहभागींना एकत्र आणले आणि हे यश साजरे केले.या बैठकीला बीएमसीटी, डीपी वर्ल्ड, एपीएमटी, बीपीसीएल, एनएसएफटी, एनएसडीटी आणि जेजेएलटीपीएल या जवाहरलाल नेहरू पत्तनमधील टर्मिनल ऑपरेटर्स उपस्तिथ होते. एमएएनएसए, सीएसएलए, एफएफएफएआय, सीएफएसएआय, एलसीबीयूए, आणि बीसीबीए सारख्या व्यापार संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बंदर आपली क्षमता सदैव बळकट करत असताना, कंटेनर टर्मिनलचा विस्तार आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा यासारख्या चालू असलेल्या प्रकल्पांमुळे जागतिक व्यापारातील एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून जनेप प्राधिकरणाचे स्थान आणखी मजबूत होईल.

> **विकासात्मक घडामोडींमुळे, भारताच्या आर्थिक विकासात आणि सागरी नेतृत्वात आणखी योगदान देत, जनेप प्राधिकरण भविष्यात आणखी अधिक मोठ्या प्रगतीसाठी सज्ज आहे.**
> **–उन्मेष वाघ, अध्यक्ष जनेपप्रा**

## ग्रामीण भागातून महिला उद्योजक निर्माण व्हावेत –आमदार दळवी



**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातून चांगल्या महिला उद्योजक निर्माण व्हायला हव्यात, यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला चालना मिळेल आणि ग्रामीण भागातील महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील. त्यासाठी जे सहकार्य लागेल ते देण्याचा माझा प्रयत्न राहील, असे मत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केले.

ते अलिबाग येथील मेघा टॉकीज येथे आयोजित धुंधुर मास महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात बोलत होते. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस महेश मोहीते, जिल्हा परिषदेच्या माजी गटनेत्या मानसी दळवी, जुईली दळवी, संजिवनी नाईक उपस्थित होत्या. महिला उद्योजकांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने उद्यम सखी आणि शिवसेना महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

४२ महिलांनी उद्योजकांनी आपले स्टॉल्स या ठिकाणी लावले आहेत. चार दिवस हा महोत्सव सर्वांसाठी खुला असणार आहे, अशी माहिती संजिवनी नाईक यांनी दिली.

## पेण आज विविध कार्यक्रम

**पेण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग)जिल्हा शाखा, रायगड यांच्या वतीने राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा अध्यक्ष उदय गायकवाड व कार्यवाह विजय पवार यांच्या नेतृत्वाखाली सन २०२५ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा व जिल्हा आदर्श शिक्षक, आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळा ५ जानेवारी २०२५ रोजी पेण जि.रायगड येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रम संस्थापक आमदार संजयजी केळकर यांच्या अध्यक्षतेखाली व ना. आदिती तटकरे, ना. भरत गोगावले, राज्यसभा सदस्य खासदार धैर्यशील पाटील, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या भव्य दिव्य सोहळ्यास जिल्ह्यातील शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन जिल्हा कार्यवाहक विजय पवार व जिल्हा कार्यकारणी यांनी केले आहे.

# कामोठ्यातील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात शुक्रवारी (दि.३) इयत्ता ८ ते १० वी मधील सर्व विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी एम.पी.ए.एस. सी.कॉलेज पनवेलचे प्रा. संजय गायकवाड, प्रा.अजय धोडी, नंदिनी गायकवाड, कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.



विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक एम.डी. गावंड यांच्या हस्ते मार्गदर्शकांचे स्वागत विद्यालयाकडून करण्यात आले. पनवेल कॉलेजचे भौतिकशास्त्रचे विभाग प्रमुख डॉ. संजय गायकवाड यांनी प्रास्ताविकेत सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे मार्गदर्शन कार्यक्रमाचे महत्व सांगितले. त्यानंतर एम.पी. एस.सी. कॉलेजचे विद्यार्थी प्रणव दुबल, आरोशी यादव, यश कांबळे व उजाला चव्हाण यांनी विद्यार्थांना ऑनलाईन फसवणूक, विविध ॲप्स डाऊनलोड करताना कोणती काळजी घ्यावी , ऑनलाईन खरेदी करताना कोणती दक्षता घ्यावी, सोशल मिडिया वापर कसा करावा तसेच पासवर्ड कसा ठेवावा याबद्दल माहिती दिली तसेच आयटी विभागाच्या प्रमुख नंदिनी गायकवाड यांनी कम्पुटर व्हायरस आणि हॅकिंग यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कामोठे विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केल्याबद्दल विद्यालयातील उपशिक्षक अनिल पाटील यांनी सर्व उपस्थित मार्गदर्शकांचे आभार मानले. या कार्यक्रमावेळी विद्यालयातील डी.जी. खुटले, व्ही.व्ही.फडतरे, पेरवी सर, आर.बी. चिपळेकर उपस्थित होते.

## उद्या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, महापारेषण मधील आयोजित आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा – कलाकुंभ २०२४ यावर्षी नाशिक येथे होणार आहे. त्याचे उद्घाटन ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता होणार आहे.

या नाटच स्पर्धेसाठी राज्यभरातील आठ परिमंडळ व सांघिक कार्यालय असे मिळून एकूण नऊ नाटके सादर करण्यात येणार आहे. यामध्ये महापारेषण कंपनीचे कर्मचारी आणि अधिकारी सहभागी होणार आहेत. नाशिक येथील महावीर कालिदास कलामंदीर शालिमार, नाशिक येथे चार दिवस या नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटन महापारेषण अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार यांच्या हस्ते होणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून सतीश चव्हाण, अविनाश निंबाळकर, तृप्ती मुधोळकर, सुगत गमरे, भरत पाटील यांच्यासोबत प्रसिद्ध मराठी सिनेमा कलाकार कुशल बद्रिके आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

आयोजन संजीव भोळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण भालेराव, अनिल भारसाकळे, संजय अत्राम, मनीष खत्री, प्रकाश लिमकर, मिलिंद घोलप, चंद्रशेखर बोराडे आदी करणार आहे.

## रवींद्र नाट्य मंदिर फेब्रुवारी अखेरपर्यंत खुले करा –ना. शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

पु. ल. देशपांडे अकादमीच्या नुतनीकरणाचे काम लवकरात लवकर पुर्ण करुन नाट्य, सिनेमा कलावंत आणि प्रेक्षकांना रवींद्र नाट्य मंदिर फेब्रुवारी अखेर पर्यंत खुले करू देता येईल या दृष्टीने कामाचे नियोजन करा, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिले.



महाराष्ट्र शासनाच्या पु. ल. देशपांडे अकादमीच्या नुतनीकरणाचे काम वेगाने सुरू असून या कामाची पाहणी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांनी केली. या वेळी अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबधित अधिकारी उपस्थित होते. हे नुतनीकरण करत असताना कलावंत व प्रेक्षकांना अद्यावत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून रवींद्र नाट्य मंदिरात नाटक अथवा सिनेमासुध्दा पाहता येणार आहे.

## सारथी वाहतूक आघाडीचा वर्धापन दिन

**धाराशिव : प्रतिनिधी**

सारथी वाहतूक आघाडी असोसिएशन या ड्रायव्हर हितसंबंधी कार्यरत संस्थेचा चौथा वर्धापन दिन नुकताच झाला. या दरम्यान संबंध महाराष्ट्रातून ड्रायव्हर बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.



आमदार सुजितसिंह ठाकूर, परंडा पोलीस निरिक्षक विनोद इज्ञपवार (पी.आय.), योगेश कांबळे संस्थापक अध्यक्ष सारथी वाहतूक आघाडी, संजयकुमार बनसोडे आर.पी.आय.प्रदेश चिटणीस, रणजीतसिंहजी पाटील सामाजिक कार्यकर्ते, ज्ञानोबा भगवान मुंडे (मुंडे कलाकार) एसटी चालक माँसाहेब कॅब संघटना संस्थापक अध्यक्ष वर्षाताई शिंदे पाटील ॲड. जहीर चौधरी कायदेशीर सल्लागार सारथी वाहतूक आघाडी यांनी ड्रायव्हर बांधवांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यात संचालक उपाध्यक्ष महेश राऊत, डॉ. अण्णाराव घुगे, सुशांत मनोहर ताम्हणकर, अमोल भोगाडे, शिवकुमार उमरदंड, कृष्णा बाबर, उमेश हिवराळे, विलास वाघमारे, अक्षय पाटणकर, राज पुणेकर, राम शाहीर, महेश वडघुले यांनी केले तसेच सचिव सागर पोमन व सर्व चालक–मालक सारथी बंधू उपस्थित होते.

# परळीत कृषी सेवा केंद्राचे होणार उद्घाटन

### खासदार धैर्यशील पाटील यांची लाभणार उपस्थिती

**पाली : प्रतिनिधी**

नाबार्ड पुणे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र सरकारच्या दहा हजार शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या योजने अंतर्गत प्रस्थापित सुधागड वैभव फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. शेतकऱ्यांसाठी माफक दरात खते बियाणे औषधे आणि शेती उपयोगी वस्तूंसाठी ६ जानेवारी २०२५ रोजी सोमवारी सकाळी ११ वाजता परळी सुधागड येथे कृषी सेवा केंद्राचे उदघाटन करण्यात येणार आहे.

थेट शेतकरी ते ग्राहक विक्री कृषी सेवा केंद्राचे उदघाटन राज्यसभा खासदार धैर्यशील दादा पाटील व माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. निलीमा पाटील यांच्या हस्ते होणार आहे. तर या कार्यक्रमास MCDC व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे, नाबार्ड जिल्हा विकास व्यवस्थापक प्रदीप अपसुंदे, रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, पळस्पे सरपंच चंद्रकांत भोईर, सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, परळी सरपंच साक्षीताई देसाई आदी उपस्थित राहणार आहेत.

तालुक्यातील अधिकाधिक शेतकरी, सुधागड वासीय नागरिक आदींनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुधागड वैभव फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. सर्व संचालक मंडळ आदींनी केले आहे.

पान १ वरुन

## यंदाही भव्य स्वरूपात नमो चषक स्पर्धा रंगणार

नमो चषक २०२५ स्पर्धा अधिक उत्साहाने आणि भव्य स्वरूपात होणार आहे. विविध स्पर्धांसोबत राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे या सर्व नमो चषक स्पर्धेचे यंदाही योग्य नियोजन व यशस्वी आयोजन झाले पाहिजे यासाठी प्रत्येक समितीने आपापल्या समितीचा नियमित आढावा घ्यावा, अशी सूचनाही मुख्य आयोजक परेश ठाकूर यांनी समित्यांना या बैठकीच्या माध्यमातून केली.

## पनवेलमधील बिल्डिंगची आग आटोक्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील जय भारत नाक्यावरील आदित्य देवदास बिल्डिंग येथे ३ जानेवारीच्या रात्री २च्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळताच, पनवेल महापालिकेच्या दोन अग्निशमन दलाच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी पोहचल्या. या वेळी अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नाने इमारतीमधील सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढून आगीवर नियंत्रण आणण्यात यश मिळविले.

पनवेलमधील जय भारत नाक्यावरील आदित्य देवदास बिल्डिंग येथे ३ जानेवारीच्या रात्री २च्या सुमारास तळमजला तसेच पहिला व दुसरा मजला या ठिकाणी आग लागलेली होती. रहिवासी रात्री झोपेत असताना जय भारत नाका येथील एका इमारतीच्या मीटर बॉक्समध्ये आग लागली आणि धूर मोठ्या प्रमाणात झाला. याची माहिती नगरसेविका दर्शना भोईर यांनी त्वरित पनवेल महापालिका अग्निशामक दलाला देताच दोन अग्निशमन दलाने होजरील होजच्या साह्याने कुलिंगचे काम केले.

बिल्डिंगला लॅडर लावून बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर आग लागलेल्या लकी बॅग्स दुकानातील साहित्य बाहेर काढून कुलिंगचे काम केले. तसेच बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या जेष्ठ नागरिक, मुले महिला अशा एकूण ११ रहिवाशांना रेस्क्यू करून सुखरूप बिल्डिंगच्या खाली आणले.

घटनास्थळी अग्निशमन केंद्र अधिकारी हरिदास सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली लिडिंग फायरमन वैभव ओंबसे, मंदार म्हात्रे व पनवेल, नवीन पनवेल अग्निशमन दलाचे वाहनाच्या माध्यमातून कर्मचारी यांनी तत्परतेने आग विझवल्याने मोठी दुर्घटना टळली. आदित्य देवदास बिल्डिंग मुख्य बाजारपेठेत असून वेळेत महापालिकेचे अग्निशमन दल पोहचल्याने पुढील मोठी हानी टळली. त्यामुळे उपस्थित नागरिकांनी पनवेल महापालिका अग्निशमन दलाचे कौतुक केले. या वेळी पनवेल शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व माजी नगरसेविका नीता माळी उपस्थित होत्या.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक समारंभ

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात उरण तालुका विज्ञान प्रदर्शनाचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.



३ व ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वेग–वेगळ्या प्रकारचे वैज्ञानिक प्रकल्पाचे प्रदर्शन करत सर्वांचीच मने जिंकून घेतली. या बक्षीस वितरण समारंभच्या वेळी संस्थेचे सेक्रेटरी सिद्धेश्वर गडदे, गटविकास अधिकारी समीर वाठारकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे, गोपाळ जाधव, निर्मला घरत, शंकर म्हात्रे, बबन पाटील, अविनाश नवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, विद्यालयच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या भव्य दिव्य विज्ञान प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण समारंभावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### सोनसाखळी खेचून दोघे पसार

**पनवेल :** महिला पायी घरी जात असताना त्यांच्या सोसायटीच्या आत येवून त्यांना दुखापत करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून मोटार सायकलवरुन दोघेजण पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड येथील पनवेल सिटी सेंटर बिल्डींग येथे ६३ वर्षीय सुजाता ठक्कर या आपल्या घरी जात असताना त्यांच्या सोसायटीच्या आत येवून दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गळ्यात असलेली दिड लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून ते मोटार सायकलवरून पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बेकायदा दारू विक्रीप्रकरणी कारवाई

**पनवेल :** बेकायदेशीररित्या देशी दारु विक्री करणाऱ्या दोन जणांविरुद्ध पनवेल तालुका पोलिसांच्या विशेष पथकाने कारवाई केली आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश नगर वलप गाव येथील एका किराणा दुकानात कारवाई करून त्या ठिकाणावरुन देशी दारु संत्री जीएम १८ बाटल्या ज्याची किंमत जवळपास ६३० रुपये इतकी आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी ५० वर्षीय महिला बेकायदेशीररित्या देशी दारु संत्रा गोल्ड जीएम याच्या २० बाटल्या ज्याची किंमत ७०० रुपये इतकी आहे. हस्तगत करण्यात आल्या आहेत व त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत या पथकाने कारवाई की आहे.

### लोकलच्या धडकेत अज्ञाताचा मृत्यू

**पनवेल :** खारघर रेल्वे स्थानकाजवळ लोकल गाडीची ठोकर लागून गंभीर जखमी झालेल्या अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. घडलेल्या या अपघातातील मृत व्यक्तीची अद्यापी ओळख पटली नसून पोलीस मृताच्या वारसांचा शोध घेत आहेत. मृत व्यक्तीची उंची साडेपाच फुट असून, काळा व निळा फुल बाह्यांचा हिरव्या रंगाचा कॉलर असलेला टी शर्ट व नेसणीस निळी जीन्स पॅन्ट असे कपडे त्याच्या अंगावर आहेत. उजव्या खुब्याचे बाजूस जुने ऑपरेशन झालेले निशाण ओळख चिन्ह आहे. तपासी अंमलदार पोलिस उपनिरीक्षक स.पी.भोसले, हे आहेत. नमूद वर्णनाच्या व्यक्तीच्या वारसाचा शोध लागल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे पोलिस उपनिरीक्षक एस.पी.भोसले (९८२३०८०२९२) व स.पो.उप.निरीक्षक श्रीकृष्ण वेदपाठक ( ९८७०१५७८५०) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### चाकूने केले वार, गुन्हा दाखल

**पनवेल :** वरूण बार कळंबोली येथे जेवणासाठी बसलेल्या चाळीस वर्षीय व्यक्तीला मारहाण करून चाकूने कमरेजवळ आणि दंडावर वार केल्याप्रकरणी श्रीकांत सुरेश निकम आणि अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संदीप किसन मुळीक हे सेक्टर ३ इ, कळंबोली येथे राहत असून त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. ३१ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास मुळीक आणि त्यांचा मित्र अजय हे वरूण बार, कळंबोली येथे जेवण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्रीकांत निकम याला कॉल करून माल रेडी झाला आहे, ट्रेलर लोड करून घे असे सांगितल्यानंतर त्याने मी जाणार नाही असे बोलून फोनवर शिवीगाळ केली. त्यानंतर सव्वानऊच्या सुमारास श्रीकांत निकम व त्याचे साथीदार त्या ठिकाणी आले आणि मुळीक यांना लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली आणि चाकूने डाव्या कमरेजवळ व हाताच्या दंडावर वार केले.

# उरण शहरात वाहतुकीची कोंडी

## बेशिस्तरित्या वाहन पार्किंग करणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील अंतर्गत वाहतूक कोंडीने नागरिक त्रासले आहेत. तालुक्याचे ठिकाण असणाऱ्या उरण शहरात सकाळ दुपार संध्याकाळ कधीही उरणमध्ये ही वाहतूक कोंडी पाहायला मिळते आहे. वाहतूक कोंडी रोखण्यासंदर्भात अनेकदा निर्णय घेऊनही नगर परिषद तसेच वाहतूक विभागाने पार्किंगचे फलक लावूनही त्याचा काहीही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

उरण शहरातील अंतर्गत वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उरण पोलीस, वाहतूक विभाग तसेच नगरपालिका यांच्या अनेक बैठकांमध्ये चर्चा होऊनही त्याची गेल्या अनेक वर्षांत अंमलबजावणी न झाल्याने शहरातील वाढत्या वाहनसंख्येबरोबर, बेशिस्त पार्किंगने वाहतूक कोंडीच्या समस्येत वाढ झाली आहे.

उरण शहरात रस्त्याच्या कडेला अनधिकृतरीत्या दुकाने टपऱ्या उभारलेल्या आहेत त्यामुळे उरण शहरातील अर्धा रस्ता त्यानेच अडला आहे. दुकानदार त्यांचे सामान रस्त्यावर विकण्यासाठी ठेवत असल्याने आहेत. रस्त्यावर भाजी फळे, फुले तसेच विविध वस्तू विक्रेते हातगाडीवाले यांनीही उरणच्या रस्त्यावर अनधिकृतपणे अतिक्रमण केले आहे त्या शिवाय शहरात असणारे अरूंद रस्ते या गोष्टीही वाहतूक कोंडीला कारणीभूत आहेत. त्याशिवाय वाहतूक विभाग व नगर परिषदेच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने मोठया प्रमाणावर वाहतुक कोंडी होत आहे. त्यामुळे शहरात ज्या ठिकाणी पाच ते दहा मिनिटे लागतात त्या ठिकाणी पोहचण्यासाठी अर्धा तास लागत आहे.

उरण शहरात आनंदनगर, पालवी हॉस्पिटलजवळ, राजपाल नाका, कोटनाका, गणपती चौक, स्वामी विवेकानंद चौक, पेन्शनर्स पार्क, वाणीआळी, तहसील कार्यालय जवळ, बाझारपेठ या ठिकाणी अधिक वाहतूक कोंडी पाहायला मिळत आहे. शहरात अनेक ठिकाणी चारचाकी वाहने उभी करून समोरील दुकानात खरेदी करणे, एखादे वाहन अडकून पडल्यानंतर ते बाहेर निघण्याची वाट न पाहता दुचाकी तसेच चारचाकी वाहन मध्येच घुसविणे या बेशिस्तीबरोबरच वाहतूक विभाग तसेच नगरपालिकेने तयार केलेल्या पार्किंगमध्ये वाहन उभे न करणे आदी कारणांमुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे.

या शिवाय उरण शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे त्यामुळे उरण परिसरात उरण तालुक्यातील सर्वच गावातील नागरिक दररोज खरेदी विक्रीसाठी उरण शहरात येतात. अनेकदा सामान खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक आपले चारचाकी वाहन घेऊन येण्यास पसंती देतात ही वाहने रस्त्यावर कशीही आडवी तिडवी पार्क करून खरेदीसाठी जातात.

अर्धा अर्धा तास वाहन चालक परत येत नाही त्यामुळे इतर वाहनांची आपोआपच रांग लागते व काहीही कारण नसताना व्यवस्थित पार्किंग न केल्याने वाहतूक कोंडीत वाढ होते त्यामुळे अशा बेशिस्त पार्किंग करणाऱ्या व वाहतूक कोंडीत वाढ करणाऱ्या नागरिकांवर कारवाई व्हावी, अशी ही मागणी उरण शहरातील नागरिक करीत आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आदिवासी दिनदर्शिकेचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासी दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि.१) करण्यात आले.

गणपत वारगडा हे आदिवसी सम्राटचे संपादक असून ते वेळोवेळी त्यांच्या वृत्तपत्राच्या माध्यमातून आदिवासींचे प्रश्न सातत्याने शासन दरबारी मांडत असतात. गणपत वारगडायांच्या आदिवासी सेवा संघाच्या वतीने समाजात प्रबोधन करताना अनेकांना न्यायदेखील देत असतात, असे प्रकाशन करतेवेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

या वेळी भाजपचे जेष्ठ नेते वाय.टी.देशमुख, जेष्ठ पत्रकार अनिल भोळे, पत्रकार शंकर वायदंडे, रवींद्र गायकवाड, अनिल कुरघोडे, आदिवासी सेवा संघाचे सचिव सुनील वारगडा, आशिष साबळे आदी उपस्थित होते.



**पनवेल : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवीन पनवेल उपशहरप्रमुख ज्ञानेश्वर भंडारी यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यानंतर त्यांनी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. या वेळी माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, ज्ञानेश्वर पाटील, सतीश मालुसरे, राजेश काकडे, श्रीचन भंडारी, निलेश पाटील आदी उपस्थित होते.**

## पोलीस रेझिंग डे सप्ताहानिमित्त कार्यक्रम

**पनवेल :** पोलीस स्थापना दिनाच्या औचित्याने पोलीस रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याअंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे नवी मुंबई पोलीस वाद्य-वृंद पथकाच्या वतीने गीत वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या वेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी तसेच समाजातील विविध घटकाचे प्रतिष्ठीत नागरिक व पनवेलकर उपस्थित होते व त्यांनी या वाद्य वृंद पथकाने सादरीकरण केलेल्या गीत वादनाच्या कार्यक्रमाचे कौतुक केले.





**उरण : जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांना नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी बीएमएसचे महामंत्री सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, ज्ञानेश्वर सोनावणे व अनिल चिर्लेकर यांनी भेट घेतली.**

**खारघर : समर्थ प्रशिक्षण केंद्राच्या संचालिका रंजना चौधरी यांनी बिहारची मधुबनी कला व महाराष्ट्राची वारली कलेला चालना देत सर्व महिलांना मधुबनी आणि वारली कलेचे प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध केला आहे. त्यासाठी त्यांनी संस्थेच्या प्रशिक्षणाला उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना सन्मानित केले. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल उपस्थित होते.**



## ए.के. शेख यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील ज्येष्ठ गजलकर ए.के. शेख यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अखिल भारतीय संयुक्त मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन श्रीरामपूर येथे करण्यात आले होते. या वेळी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

छप्परबंद उर्दू शिक्षण संस्था, मिल्लत नगर येथे साहित्यिक इतेखाब फराश आणि स्पंदन त्रैमासिकाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी या संमेलनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सलीम शेख होते. सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात आली. त्यानंतर माजी नगराध्यक्ष किरण ससाणे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष अल्ताफ शाह उपस्थित होते. गजलकार, साहित्यिक, तसेच मुस्लिम मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ए. के. शेख यांना 'फक्रे-मिल्लत' हा किताब देऊन जीवनगौरव पुरस्काराने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आयोजक इंतेखाब फराश सोनवणे, संमेलन अध्यक्ष सलीम शेख, गझलकार वी इक्बाल मिन्ने यांच्या हस्ते शेख यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना गजलकार ए. के. शेख यांनी आपल्या भाषणात, साहित्यिकांनी आपले जिवंत अनुभव मांडावे, तर डॉ. सलीम शेख यांनी आपल्या समाजाबद्दल पसरलेले गैरसमज दूर करण्यासाठी साहित्यिकांनी आपल्या लेखणीद्वारे प्रयत्न करावेत, असे मत मांडले. या वेळी उपस्थित कवींनी आपल्या कविता, गजल सादरीकरणाद्वारे कार्यक्रमात रंगत आणली. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात रसिक चाहत्यांची उपस्थिती लाभली.

## एमएनएम विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

### ◆ माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.



या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या प्रणिता गोळे,पर्यवेक्षक अरूण जोशी, रयत च्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, गव्हाण विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. दैनंदिन जीवनामध्ये विज्ञानाचा वापर व उपयोग या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रतिकृतीं मधून पाहुण्यांना उत्तम माहिती सांगितली.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, प्राचार्य प्रणिता गोळे, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे इ. मान्यवरांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांकडून विविध उपकरणे व प्रतिकृतींची माहिती घेतली. विद्यार्थ्यांने देखील इंग्रजी मधून विज्ञानातील विविध उपकरणे व प्रतिकृतींची माहिती सांगितली.

या विज्ञान प्रदर्शनास प्रारंभ होण्यापूर्वी विद्यालयाच्या कार्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विजय घरत व गोवर्धन गोडगे यांचे हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

## 'फुटपाथवरील अतिक्रमण हटवा'

**पनवेल :** महापालिका क्षेत्रात सध्या अनधिकृत बिना परवाना धारक अतिक्रमण आठवडे बाजार या सर्वांवर तोडक व जप्तीची कारवाई चालू आहे. यामध्ये कामोठे-खारघर-नवीन पनवेल खांदा कॉलनी व सर्वच परिसरात खाद्यपदार्थ व स्वीट्सची मोठी-मोठी परप्रांतीयांची दुकाने ज्यांनी फुटपाथ गिळंकृत करत फूटपाथचेही भाडे घेत अनेक स्टॉल बिना परवाना अनधिकृत रित्या उभे केले आहेत. अशांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वात महानगर संघटक मंगेश रानवडे, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, महिला तालुकाप्रमुख मंदाताई जंगले तळोजा विभाग प्रमुख प्रकाश म्हात्रे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदन देऊन केली आहे.

## फडके विद्यालयात भरली अनोखी पालक शाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात आज एक अत्यंत वेगळा आणि आनंददायक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे पालक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत सहभागी झाले होते.

सकाळी ढोल ताशाच्या गजरात पालकांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर, विद्यार्थ्यांप्रमाणेच पालकांनी शाळेतील परिपाठ, प्रार्थना, ओमकार,मेडिटेशन व श्लोक पठण केले. यानंतर १ तासिका चित्रकला होऊन त्यांना डबा खाण्याकरिता सुट्टी देण्यात आली यावेळी सर्वांनी असेंबली हॉलमध्ये गोल करून डबा खाण्याचा आनंद घेतला नंतर झढ तासामध्ये डॉजबॉलसारख्या खेळांचा आनंद घेतला.

या उपक्रमामध्ये पालकांची उत्साही सहभागिता पाहून शाळेच्या शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले. एकत्रितपणे शालेय वातावरणात वेळ घालवण्यामुळे पालकांमध्ये लहानपणीच्या आठवणी जाग्या झाल्या. हे अनोखे व छान उपक्रम आम्ही पुन्हा-पुन्हा अनुभवू इच्छितो. यामुळे आम्हाला आमच्या लहानपणीच्या आठवणींमध्ये रमण्याची संधी मिळाली, असे अनेक पालकांनी सांगितले. शाळेच्या वतीने हा उपक्रम पुढेही नियमितपणे राबवण्यात यावा, अशी मागणी पालकांकडून केली गेली.









# 'सामना' पन्नाशीचा झाला...

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

काही कलाकृतींचे महत्त्व व अस्तित्व हे कायमच अधोरेखित होत असते. ते चित्रपटगृहातून उतरले तरी त्यांचा एक प्रकारचा 'खेळ' कायम अधोरेखित होत असतोच. सामना चित्रपट अस्साच. हा चित्रपट म्हणताच रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर बरेच काही आले असेल.

पुणे शहरात रामदास फुटाणे निर्मित व डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सामना' १० जानेवारी १९७५ रोजी प्रभात चित्रपटगृहात प्रदर्शित झाला (ही महत्त्वाची तारीख या चित्रपटाचे निर्माते रामदास फुटाणे यांजकडून) या चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. कालखंड खूपच मोठा. त्यात सामनाचा प्रवासही खूपच मोठा व वळणावळणाचा.

'सामना' निर्मितीची सुरुवात अशी, कोल्हापुरात चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांच्या हस्ते फटमार, अभिनेते चंद्रकांत मांढरे यांच्या हस्ते फुटलेला मुहूर्ताचा नारळ आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी कॅमेऱ्यामागे राहून केलेले पहिल्या दृश्याचे चित्रीकरण... एक अद्‌भुत योग... २० जानेवारी १९७४ रोजी सामनाचा मुहूर्त झाला... (तत्कालिन) ग्रामीण भागातील राजकारणावर विजय तेंडुलकर यांच्या सशक्त प्रभावी लेखणीतून साकारलेले टोकदार भाष्य... डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांच्या जबरदस्त अभिनयाचा 'सामना'... ३७८ रुपये पगार असलेले चित्रकला शिक्षक रामदास फुटाणे यांचे निर्माता आणि डॉ. जब्बार पटेल यांचे दिग्दर्शक म्हणून चित्रपटसृष्टीत (दृश्य माध्यमात) झालेले पदार्पण... भास्कर चंदावरकर यांच्या संगीताने नटलेली गीते... जी आजही लोकप्रिय आहेत. तीही या कलाकृतीची ओळख.

या चित्रपटासंदर्भात एकदा डॉ. श्रीराम लागू यांनी केलेले भाष्य खूपच बोलके आहे. ते म्हणाले होते, 'सामना' हा संवेदनशील आणि मोठा आवाका असलेला चित्रपट आहे. सुरुवातीला आम्ही आणि प्रेक्षकांनीही या चित्रपटाला फारसे गांभीर्याने घेतले नाही. फार महत्त्वाच्या चित्रपटामध्ये काम करायला अपुरा पडलो असे वाटते. मला स्वीकारले याबद्दल मी रसिकांचा आभारी आहे, अशी भावना डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केली. निळूभाऊ फुले या माणसाची महाराष्ट्राने म्हणावी तेवढी कदर केली नाही, असेही त्यांनी म्हटले.

विजय तेंडुलकर यांची लेखक म्हणून केलेली निवड यामध्येच चित्रपटाचे यश निश्चित होते, असे एकदा रामदास फुटाणे यांनी सांगितले. 'सोंगाड्या' (१९७१) चित्रपटाच्या वेळी दादा कोंडके यांच्याकडे प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून केलेल्या कामाचा निर्माता म्हणून फायदा झाला. त्या वेळी अवघ्या दीड लाख रुपयांत चित्रपट झाला, पण तेही जमा करताना कष्ट पडले. बर्लिन चित्रपटासाठी निवड झाल्यानंतर तेथे जाण्यासाठी एका दिवसामध्ये झालेला पासपोर्ट आणि ६७ हजार रुपयांवरून २७ हजार रुपयांपर्यंत कमी झालेले विमानभाडे हा किस्साही रामदास फुटाणे यांनी एकदा मला सांगितला. आजही 'सामना'चा विषय निघाला की रामदास फुटाणे अतिशय भरभरून बोलतात. हा त्यांना एक ओळख मिळवून देणारा ठरलाय.

रामदास फुटाणे यांनी नेहमीच आवर्जून सांगितलेय, 'सामना'ची निर्मिती माझ्या हातून घडायला निमित्त झालं ते दादा कोंडके यांचं. 'सोंगाड्या'च्या निर्मितीच्या वेळी दादांनी मला कोल्हापुरात बोलावून घेतलं होतं. त्या वेळी मी मुंबईच्या एका विद्यालयात चित्रकलेचा शिक्षक होतो. चित्रकला शिक्षक असतानाच दादांशी मैत्री झाली होती आणि त्या मैत्रीपोटी ते म्हणाले, की नोकरी सोडा आणि प्रॉडक्शन पाहा. मी नोकरी सोडली नाही, पण दादांसोबत कोल्हापुराला गेलो. महिन्याला दहा दिवस रजा घेऊन मी 'सोंगाड्या'चं प्रॉडक्शन (निर्मिती व्यवस्थापन) पहायचो. सदिच्छा चित्र हे दादा कोंडके यांचे चित्रपट निर्मिती बॅनर. 'सोंगाड्या' प्रदर्शित झाल्यावर (तेव्हा तो एक लाखात केला होता. स्वस्ताई होती खूपच, १९७०/७१ची गोष्ट ही) 'एकटा जीव सदाशिव'ही (१९७२) केला होता. या दोन्ही चित्रपटांचे दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांचे होते. त्यानंतर गोविंद कुलकर्णी दिग्दर्शित 'हऱ्या नाऱ्या झिंदाबाद' (१९७२) हा एक सिनेमा केला. वसंत सबनीसांनी लिहिला होता. शुभं करोती चित्रच्या या चित्रपटाचेही प्रॉडक्शन मी केलं होतं. निळू फुले, सरला येवलेकर व राम नगरकर यांच्या भूमिका होत्या.

या एकूणच अनुभवातून या धंद्यात सिनेमा काढण्यासाठी किती पैसे लागतात, कोणत्या डिपार्टमेंटला किती खर्च येतो याचा एक आराखडा मनात निश्चित होता आणि काय काय करायचं नाही हे नक्की केलं होतं. रामदास फुटाणे 'सामना' निर्मितीच्या आठवणीत रमतात.

विजय तेंडुलकर यांना पहिल्यांदा भेटलो तेव्हा, एखादा चित्रपट लिहून द्या अशी मागणी त्यांच्याकडं केली. सहा महिने त्याचा पाठपुरावा करत होतो. ते तयार झाले तेव्हा त्यांनी एक आग्रह धरला. निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू हे दोन अभिनेते चित्रपटात असायला हवेत. मी तो मान्य केला. त्या दोघांनाच केंद्रस्थानी ठेवून तेंडुलकर यांनी 'सामना' लिहिला. चित्रपटाचे शुटिंग सुरू झाले, तेव्हा निळू फुलेंना डॉ. लागू बारकाईने न्याहाळत होते. त्यांनी उभे केलेल्या पात्रापेक्षा वेगळे काहीतरी करायला हवे, असा डॉ. लागूंचा विचार होता. झालेही तसेच. दोन्ही कलावंतांनी परस्पर भिन्न पात्रे साकारुन चित्रपटाच्या संहितेला न्याय दिला. तेव्हा अभिनेते म्हणून ही दोन्ही माणसे विलक्षण होती. याची प्रचिती आली.

'सामना' पुणे आणि मुंबईतील काही भाग वगळता अक्षरशः फ्लॉप झाला. समिक्षकांचा चांगला प्रतिसाद होता. तरी चित्रपट रसिकांना फारसा आवडला नव्हता. या पडद्यावर चित्रपट सुरू असतानाच डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांची दृश्ये सुरू असताना लोक झोपतात, अशा प्रतिक्रिया दुर्दैवाने आम्हाला येत होत्या, असे रामदास फुटाणे सांगतात तेव्हा फारच आश्चर्य वाटते. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील हीदेखील एक गोष्ट लक्षात येते.

रामदास फुटाणे सांगतात, चित्रपटाची ही परिस्थिती असतानाच अचानक सामनाची बर्लिनच्या चित्रपट महोत्सवासाठी निवड झाल्याची बातमी रेडिओ आकाशवाणीद्वारे आमच्यापर्यंत आली आणि त्यानंतर डॉ. श्रीराम लागू यांच्या प्रयत्नांमुळे आम्ही बर्लिनला जाऊ शकलो. त्यांच्यामुळे घडलेला हा पहिला दौरा कधीच विसरू शकणार नाही. नवी दिल्लीत यासाठीचा खेळ आयोजित करण्यात नर्गिस दत्त यांचे सहकार्य मिळाले होते. बर्लिन चित्रपट महोत्सवात दाखल झालेला हा पहिला मराठी चित्रपट,' अशा भावना व्यक्त रामदास फुटाणे यांनी आठवणींना उजाळा दिला होता.


सामना चित्रपटगृहात अपयशी ठरूनही तो बर्लिनच्या चित्रपट महोत्सवात निवडला गेल्याची बातमी आली. लागलीच डॉ. लागूंचे घर गाठले आणि निधीसाठी त्यांना मंत्रालयात येण्याची विनंती केली. कोणासमोर कधीही हात न पसरलेल्या डॉ. लागूंनी त्या दिवशी सांस्कृतिक मंत्र्यांशी चर्चा करून निधीची व्यवस्था केली आणि आमचा परदेश दौरा निश्चित झाला, अशी आठवणीही फुटाणे यांनी सांगितली होती.

तेंडुलकरांनी या सिनेमाचं नाव 'सावलीला भिऊ नकोस' असं दिलं होतं, मात्र हे नाटकाचं शीर्षक वाटत होतं आणि ते खरेही होते. अनेकांना ते पटलं नव्हतं. तेंडुलकरांना मग आम्ही ते बदलण्याची विनंती केली. नंतर आठ-दहा दिवसांनी त्यांनीच 'सामना' हे शीर्षक ठेवलं. मग आम्ही भास्कर चंदावरकरांच्या घरीच बसलो. तेंडुलकरांनी अप्रतिम वाचन केलं. माझ्या तर डोळ्यांत पाणी आलं ते ऐकताना! सिनेमाच्या मुहूर्तासाठी आम्ही कोल्हापुरात गेलो. भालजींना (पेंढारकर) भेटलो. त्यांच्या हस्ते मुहूर्त व्हावा, असं वाटत होतं, पण त्याच वेळी लता मंगेशकर कोल्हापुरात होत्या, असं भालजींनी सांगितलं. मग त्यांना भेटलो. त्यांनी होकार दिला. मग त्यांच्या अन् चंद्रकांत मांडरेंच्या उपस्थितीत 'सामना'च्या मुहूर्ताचा नारळ फुटला... मुहूर्ताचा शॉट निळू फुलेंवर होता. त्यांनी त्यांच्या त्या खास खर्जातल्या आवाजात ते 'जगदंब... जगदंब...' म्हटलं अन् 'सामना' सुरू झाला!

सामना चित्रपट सर्वप्रथम पुणे शहरात प्रभात चित्रपटगृहात प्रदर्शित झाला तेव्हा जेमतेम थिएटर भाड्याचे पैसे मिळाले. त्यानंतर सांगली शहरातील आनंद व पंढरपूर येथील अकबर चित्रपटगृहात प्रदर्शित झाला, पण विशेष प्रतिसाद मिळत नव्हता. १४ फेब्रुवारी रोजी मुंबईत गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृह आणि गोरेगाव येथील अनुपम चित्रपटगृहात सामना प्रदर्शित झाला. (याच शुक्रवारी मुंबईत गुलजार दिग्दर्शित आंधी प्रदर्शित झाला.) मुंबईमध्येही ३० हजार रुपयांचे नुकसान झाले. मुंबईत सामना प्रदर्शित करताना वृत्तपत्राच्या जाहिरातीत म्हटले होते, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवालसारखी प्रक्षोभक नाटके देणाऱ्या विजय तेंडुलकरांच्या लेखणीचा नवा मराठी चित्रावतार. (ही जाहिरात आणि सामनाचे बुकलेट माझ्या कलेक्शनमध्ये आहे हे विशेषच.)

१९ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी घोषित करण्यात आली व सामना, आंधी इत्यादी काही चित्रपटांचे प्रदर्शन स्थगित करण्यात आले. मत स्वातंत्र्याची गळचेपी असे यावर आजही म्हटले जाते. हा एक वेगळाच 'सामना'. एकोणीस महिन्यांनंतर आणीबाणी उठल्यावर देशातील लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाचे सरकार आले आणि सामना, आंधी इत्यादी चित्रपटांचा प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला. 'सामना'चे मूळ वितरक टेम्पल मुव्हीज प्रकाशनकडून सामनाचे हक्क रामदास फुटाणे यांजकडे आले. त्यांनी तोपर्यंत सर्वांचे देणे फेडले होते. बर्लिन महोत्सवानंतर हा चित्रपट एकदम चर्चेत आला आणि यशस्वी झाला. आता सामना चित्रपट हा रामदास फुटाणे यांच्यासाठी निवृत्तिवेतन म्हणजे पेन्शनची रक्कम देणारा ठरला. त्यांनी ८ एप्रिल १९७७ रोजी मुंबईत प्लाझा चित्रपटगृहात रोज चार खेळ असा सामना पुन्हा प्रदर्शित करताच आठवड्यातील सर्वच्या सर्व अठ्ठावीस खेळ हाऊसफुल्ल ठरले. चित्रपटाच्या जगात यश म्हणजेच चलनी नाणे. असा हाऊसफुल्ल चित्रपट आपल्याही चित्रपटगृहात प्रदर्शित व्हायलाच हवा असे चित्रपटगृह प्रदर्शकांना वाटणे अगदी स्वाभाविकच. (ही तर दीर्घकालीन व्यावहारिक मानसिकता) रामदास फुटाणे यांनी मात्र चित्रपटगृह चालकांशी करारमदार करताना आपल्या काही व्यावहारिक अटी/शर्ती ठेवल्या आणि त्या मान्यदेखील झाल्या.

'सामना' आता राज्यातील अनेक शहरात, तालुक्याच्या ठिकाणी एकेक करत प्रदर्शित होत राहिला. मी स्वतः अलिबागमधील महेश चित्रपटगृहात पाहिला (आता त्याजागी ब्रह्मा विष्णु महेश अशी जुळी थिएटर्स उभी राहिलीत.) ते माझे शालेय वय होते. त्या काळातील मार्मिक, रसरंग, प्रभंजन, मनोहर, सोबत अशा साप्ताहिकता १९७५ साली 'सामना'चे परीक्षण वाचले, त्यानंतर त्यावरील बंदीवरचा फोकस समजला आणि १९७७ साली सामना पुन्हा प्रदर्शित होत असल्याचे समजले आणि सामना चित्रपट पाह्यलाच हवा याबाबत माझी उत्सुकता वाढली. १९७५ ते १९७७ या कालखंडात सर्वच वयोगटातील चित्रपट रसिकांची अशीच भावना असेल. आज साठी ओलांडलेले जुन्या आठवणीत गेलेही असतील. चित्रपटाकडे आपण जाण्याचीही एक प्रक्रिया असतेच. ती सामनासारख्या चित्रपटांच्या बाबतीत महत्त्वाची असते.



सामना चित्रपट म्हणजे, ग्रामीण भागातील राजकारणावर विजय तेंडुलकर यांच्या सशक्त लेखणीतून साकारलेले भाष्य अशी मुहूर्तापासूनच चर्चा होऊ लागली होती. त्या काळात असे होत असे. मुद्रित माध्यमातून चित्रपट मुहूर्ताच्या बातम्या फोटोसह येत. मग गाण्यांचे रेकॉर्डिंग झाले. चार रिळांचे शूटिंग झाले. आणखी एक चित्रीकरण सत्र पार पडले असे करत करत चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचत असे. 'सामना'चे चित्रीकरण कोल्हापुरातील जयप्रभा स्टुडिओ व शालिनी स्टुडिओत झाले.

डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांच्या कसदार अभिनयाचा 'सामना' असं हा आजही तेच म्हटले जाते. रामदास फुटाणे यांचे निर्माता आणि डॉ. जब्बार पटेल यांचे दिग्दर्शक म्हणून चित्रसृष्टीत झालेले पदार्पण हेही 'सामना'चे वैशिष्ट्य. 'मारुती कांबळेचं काय झालं' या रोखठोक संवादासह सरपंच आणि मास्तर यांच्यातील संभाषणाची जुगलबंदी अशी वैशिष्ट्य. हा कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट चित्रपट सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या काळातील, मग दूरदर्शन, चॅनेल, यू ट्यूब चॅनेल आणि एखाद्या चित्रपट महोत्सवात अधूनमधून त्याचा शो असा या चित्रपटाचा प्रवास सुरू आहे.

सत्तरच्या दशकात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकारी साखर कारखानदारी आणि त्यातूनच निर्माण होत असलेले महत्त्वाकांक्षी स्थानिक नेतृत्व असा सामाजिक राजकीय बदल होत होता. तोपर्यंत मराठी चित्रपटात गावातील 'पाटील' दिसे. 'सामना'ने त्यात बदल घडवून आणला. त्याची गरज होतीच. सहकारसम्राट धोंडे-पाटील यांच्या भूमिकेत निळू फुले (त्यांची तोपर्यंतची वाटचाल पाहता अशी व्यक्तिरेखा त्यांना मिळणे आवश्यक होतेच.) आणि गांधीवादी मास्तरांच्या भूमिकेत डॉ. श्रीराम लागू असा हा अभिनयाचा कसदार 'सामना' रंगला. अभिनयासाठी हा आदर्श चित्रपट आहे. कधीही पहावा.

एका मुलाखतीत डॉ. श्रीराम लागू यांनी 'सामना'च्या आठवणी जाग्या करीत म्हटलं, हा संवेदनशील आणि मोठा आवाका असलेला चित्रपट होता आणि आहे. अगदी कायमच तसा राहिल. सुरुवातीला आम्ही म्हणजेच निर्माता, दिग्दर्शक व कलाकार यांनी आणि प्रेक्षकांनीही या चित्रपटाला फारसे गांभीर्याने घेतले नाही. फार महत्त्वाच्या चित्रपटामध्ये काम करायला अपुरा पडलो असेही मला वाटते. मला स्वीकारले याबद्दल मी रसिकांचा आभारी आहे. निळूभाऊ फुले या माणसाची महाराष्ट्राने म्हणावी तेवढी कदर केली नाही, असेही त्यांनी या मुलाखतीत सांगितले.

निर्माते रामदास फुटाणे अधूनमधून संवाद असतो. ते एकदा मला म्हणाले होते, सामना या चित्रपटासाठी विजय तेंडुलकर यांची लेखक म्हणून केलेली निवड यामध्येच चित्रपटाचे यश निश्चित होते. नाटक असो वा चित्रपट, दोन्हीत लेखक खूपच महत्त्वाचा असतो. सोंगाड्या चित्रपटाच्या वेळी दादा कोंडके यांच्याकडे प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून केलेल्या कामाचा निर्माता म्हणून फायदा झाला. त्या वेळी अवघ्या लाख दीड लाख रुपयांत चित्रपट झाला, पण तेही जमा करताना कष्ट पडले.

असो. 'सामना'च्या फर्स्ट रनच्या नुकसानीतून सर्वांचे देणे फिटल्यानंतर दोन वर्षांनी चित्रपटाचे हक्क रामदास फुटाणेंकडे आले. बर्लिन महोत्सवानंतर या चित्रपटाची वारेमाप चर्चा झाल्यावर हा चित्रपट यशस्वी झाला. आणीबाणीतील या चित्रपटावरची बंदीही तोपर्यंत उठली होती आणि पुन्हा चित्रपट प्रदर्शित केला. आता सामना चित्रपट हा माझ्यासाठी निवृत्तिवेतन म्हणजे पेन्शनची रक्कम देणारा ठरला असल्याचे रामदास फुटाणे नेहमीच सांगतात.

सामना चित्रपट हे एक महत्त्वाचे वळण आहे. अनेक कारणास्तव हा चित्रपट चर्चेत राहिला आणि आजही त्याची चर्चा होत असते. गिरीराज पिक्चर्सच्या या चित्रपटाने राज्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली.

विजय तेंडुलकरांची कथा-पटकथा-सवांद असणाऱ्या या चित्रपटाला अनेक मान्यवर पुरस्कारांनी गौरविण्यात आले. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात 'सामना'ला उत्कृष्ट मराठी चित्रपट रजत कमळ पुरस्काराने गौरविण्यात आले. तेराव्या राज्य चित्रपट महोत्सवात (१९७५) 'सामना'ला उत्कृष्ट चित्रपट व्दितीय क्रमांकाच्या पुरस्काराचे सन्मानित करण्यात आले. त्यासह उत्कृष्ट दिग्दर्शक द्वितीय क्रमांक डॉ. जब्बार पटेल, उत्कृष्ट अभिनेता निळू फुले, उत्कृष्ट कथा विजय तेंडुलकर, उत्कृष्ट छायाचित्रणकार सूर्यकांत लवंदे आणि उत्कृष्ट ध्वनिमुद्रक रामनाथ जठार अशी पारितोषिके पटकावली.

डॉ. जब्बार पटेल प्रयोगशील नाट्य दिग्दर्शक म्हणून ओळखले जात होते, 'सामना'व्दारे ते चित्रपट माध्यमात आले, तर निर्मिते रामदास फुटाणे व माधव गानबोटे हे होते. बर्लिन महोत्सवात भारताची प्रवेशिका म्हणून गेलेला पहिला मराठी चित्रपट.

या चित्रपटात विलास रकटे, मोहन आगाशे, लालन सारंग, उषा नाईक, संजीवनी बिडकर, स्मिता पाटील, आशा पाटील, रजनी चव्हाण, सुरेखा शहा, आबू, भालचंद्र कुलकर्णी, नंदू पोळ इत्यादी कलाकारांच्याही प्रमुख भूमिका आहेत. पन्नास वर्षांनंतरही आणि ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईटमध्ये असूनही हा चित्रपट आजही त्याच कौतुकाने बघितला जातो. व चित्रपटाची विविध संदर्भात विशेष चर्चा सुरू असतेच. या चित्रपटाची गीते आरती प्रभू, जगदीश खेबूडकर यांची असून भास्कर चंदावरकर यांचे संगीत आहे. या चित्रपटातील कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, सख्या रे घायाळ मी हरिणी, कुणी तरी अशी पटापट गंमत आम्हा सांगेल काय (या गाण्यात स्मिता पाटीलचे दर्शन घडते) ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटाचे छायाचित्रण सूर्यकांत लवंदे यांचे, तर संकलन एन.एस. वैद्य यांचे आहे. आजही सोशल मीडियात सामना या चित्रपटाची अनेक संदर्भात दखल घेतली जाते. 'सामना'नंतरचा डॉ. जब्बार पटेल यांचा चित्रपट कोणता असेल याची मराठी चित्रपटसृष्टी, प्रसारमाध्यमे आणि चित्रपट रसिकांत विशेष उत्सुकता होतीच. तो चित्रपट होता सिंहासन.

'सिंहासन'मध्ये सत्तरच्या दशकातील महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट मांडला होता. सत्तेच्या वर्तुळातील महत्त्वाकांक्षा व स्पर्धा, मंत्रिमंडळातील सत्ताचक्र, त्यातील डावपेच, मुंबईतील कामगारवर्गाचा नेता आणि मुख्यमंत्री यांच्यातील छुपा तर कधी उघड संघर्ष, कुरघोडीचे राजकारण आणि या सगळ्यावर राजकीय पत्रकार दिगू टिपणीस याचे निरीक्षण, भाष्य व विश्लेषण. आणि सगळा डाव-प्रतिडाव अनुभवल्यावर दिगू टिपणीस सैरभैर होणे, विक्षिप्त हसत आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो.

सामना चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत ही खूपच मोठी सामाजिक, सांस्कृतिक व माध्यम क्षेत्रातील गोष्ट. या काळात चित्रपट बदलला, प्रेक्षक बदलला, प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचण्याची माध्यमे बदलली, राज्यातील ग्रामीण भागातील राजकारणातील संदर्भ बदलले, मानसिकता बदलली. सामना चित्रपटाची ताकद व वैशिष्ट्ये कायम राहिली.

सामना चित्रपटाला चाळीस वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त २०१४ साली पुणे शहरात एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी चित्रपटविषयक परिसंवादात सामना चित्रपटाचा कायमच उल्लेख होतो. मराठीतील राजकीय चित्रपटातही सामनाचा संदर्भ असतो. आणीबाणीतील सांस्कृतिक क्षेत्रावरील बंदी या गोष्टीतही सामना असतोच.


अनेक विषयासंदर्भात सामना चित्रपटाचे अस्तित्व कायम टिकून आहे. अशा कलाकृती एकदाच बनतात आणि कायमचा आपला प्रभाव कायम ठेवतात.

---

## ज्येष्ठ साहित्यिक विजय तेंडुलकर

विजय धोंडोपंत तेंडुलकर (६ जानेवारी १९२८–१९ मे २००८) म्हणजे एक चतुरस्र लेखक, वृत्तपत्रव्यवसायी, लघुकथालेखक, लघुनिबंधकार, अखिल भारतीय कीर्तीचे नाटककार, नव्या रंगभूमीचे प्रमुख आधारस्तंभ. त्यांचा जन्म मुंबई येथे गिरगावात झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, पुणे आणि कोल्हापूर येथे झाले. १९४३मध्ये त्यांच्या शालेय शिक्षणात खंड पडला. शालेय शिक्षणापेक्षा घरातील वाङ्मयप्रेमी वातावरणाचे संस्कार त्यांच्यासाठी प्रेरक ठरले. त्यांचे वडील कारकुनी करायचे आणि प्रकाशक, लेखक, हौशी नट-दिग्दर्शक होते. वडिलांच्या पुस्तकांच्या दुकानात बसणे, मुद्रिते तपासणे इत्यादींमधून वाङ्मयग्रहणाचे व लेखनाचे पाठ तेंडुलकरांना मिळाले. लहानपणी ते पाश्चिमात्य नाटके पाहायचे. त्यातूनच त्यांना नाटके लिहिण्याची स्फूर्ती मिळाली.

प्रसिद्ध साहित्यिक वि. वि. बोकील हे तेंडुलकरांचे पुण्यामधील शिक्षक. बोकिलांप्रमाणेच दि.बा. मोकाशी याच्या कथालेखनाचे तसेच अनंत काणेकर व शिवराम वाशीकर यांच्या संवादलेखनाचे संस्कार तेंडुलकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर झालेले आहेत. १९५७पर्यंत त्यांचे वास्तव्य पुण्यात होते. त्यानंतर पुढे काही काळ ते मुंबईत राहिले. पुणे-मुंबई, मुंबई-पुणे असा अनिश्चित भ्रमंतीचा काही काळ लोटल्यानंतर १९६६ पासून मुंबई हेच त्यांच्या वास्तव्याचे व कामाचे कायम स्थान बनले. मुंबईतील वास्तव्यामुळेच तेंडुलकरांचा प्रयोगशील रंगभूमीशी व 'रंगायन', 'आविष्कार', 'भारतीय विद्या भवन कला केंद्र', 'अनिकेत' यांसारख्या नवनाट्याविषयी आस्था बाळगणाऱ्या संस्थांशी व त्यांतील कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचा संबंध आला. रंगभूमीशी आरंभापासूनच आत्मीयतेने निगडित असूनही तेंडुलकरांनी नाटकांकडे व्यावसायिक दृष्टिकोणातून पाहण्याचे कटाक्षाने टाळलेले आहे. वृत्तपत्रीय लेखन आणि नियतकालिकांचे संपादन हेच त्यांचे आरंभीचे आणि नंतरचेही उपजीविकेचे प्रमुख साधन. कोवळी उन्हे (१९७१), रातराणी (१९७१), फुगे साबणाचे (१९७४) यांसारखे त्यांचे स्फुट ललितनिबंधसंग्रह यातूनच जन्माला आले. तेंडुलकर हे नियतकालिकांशी निगडित राहिल्याने त्यांनी लघुकथास्वरूपाचे किंवा व्यक्तिचित्रणात्मक पद्धतीचेही बरेच लेखन केलेले आहे. त्यातील काही काचपात्रे (१९५८), द्वंद्व (१९६१), मेषपात्रे (१९६५), गाणे (१९६६), फुलपाखरू (१९७०) इत्यादी नावांनी संकलित केले गेले आहे. दिवाकरांच्या नाट्यछटाही त्यांनी संपादिल्या आहेत.



तेंडुलकरांचे प्रधान कार्यक्षेत्र रंगभूमी हेच आहे. १९५५पासून त्यांनी नाट्यलेखनास सुरुवात केली. त्यांच्या नाट्यलेखनाचा प्रारंभ एकांकिकालेखनाने झाला. नभोवाणीकरिता लिहिलेली रात्र ही त्यांची पहिली एकांकिका. ती बरीच लोकप्रिय ठरली. ध्वनिमाध्यमाचे त्यात चातुर्याने उपयोजन केले आहे. रात्र आणि इतर एकांकिका (१९५७) हा त्यांचा पहिला एकांकिकासंग्रह. तेंडुलकरांनी पाटलाच्या पोरीचे लगीन (१९६५), चिमणा बांधतो बंगला (१९६६), चांभारचौकशीचे नाटक (१९७०), मुलांसाठी तीन नाटिका (१९७३) इत्यादींसारखी काही बालनाट्येही लिहिली आहेत तसेच त्यांनी काही अनुवादपर नाट्यलेखनही केलेले आहे. त्यात टेनेसी विल्यम्सच्या स्ट्रीट कार नेम्ड डिझायर या नाटकाचा वासनाचक्र या नावाने केलेला अनुवाद विशेष लक्षणीय आहे. मोहन राकेश यांच्या आधे अधुरे या नाटकाचा व गिरीश कार्नाड यांच्या तुघलक या नाटकाचाही त्यांनी मराठी अनुवाद केला आहे.

तेंडुलकरांचे प्रसिद्धीदृष्ट्या पहिले नाटक श्रीमंत (१९५५) हे बरेच गाजले. त्यानंतर त्यांची माणूस नावाचे बेट (१९५६), मधल्या भिंती (१९५८), चिमणीचं घर होतं मेणाचं (१९६०), मी जिंकलोमी हरलो (१९६३), कावळ्यांची शाळा (१९६४), सरी ग सरी (१९६४), एक हट्टी मुलगी (१९६७) ही नाटके रंगभूमीवर आली. त्यांतील माणूस नावाचे बेट हे नाटक रंगभूमीवरील स्थित्यंतराचे निदर्शक मानावे लागेल. यात तेंडुलकरांनी वास्तवतेचा संपूर्ण पुरस्कार केलेला आहे. तेंडुलकरांना अखिल भारतीय स्वरूपाची कीर्ती मिळवून देणारे शांतता कोर्ट चालू आहे हे नाटक १९६८ साली रंगभूमीवर आले. या नाटकाला कमलादेवी चट्टोपाध्याय पारितोषिक मिळाले आहे. अनेक भारतीय भाषांत त्याची भाषांतरे झाली आहेत. त्याच्या पाठोपाठ अशी पाखरे येती (१९७०) आणि गिधाडे (१९७१) ही नाटके आली. गिधाडेतील उग्रकठोर वास्तववादी चित्रणाने बरीच खळबळ उडवून दिली. गिधाडेपेक्षाही तेंडुलकरांच्या सखाराम बाइंडर (१९७२) व घाशीराम कोतवाल (१९७३) या नाटकांनी अधिक प्रक्षोभ निर्माण केला. त्यांनी सुमारे २७ नाटके, २५ एकांकिका लिहिल्या. याखेरीज आठ ते दहा बालनाट्ये लिहिली.

तेंडुलकर यांची पटकथा असलेला आणि जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला सामना (१९७५) हा एक महत्त्वाचा मराठी चित्रपट होय. त्यांच्या मंथन (१९७६) या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तेंडुलकरांना या चित्रपटाच्या पटकथेसाठीही राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. ऑस्कर पुरस्करासाठी हा चित्रपट भारताकडून पाठवण्यात आला होता. त्यांचे चित्रपट अंतर्मुख करणारे आणि वेगळेपण दर्शवणारे ठरले. त्यांनी छोट्या दोस्तांसाठी ये है चक्कड बक्कड बुम्बे बो (२००३) हा बालचित्रपटही लिहिला होता.

विजय तेंडुलकर यांना व त्यांच्या कलाकृतींना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७१), मंथन या चित्रपटाच्या पटकथालेखनासाठी १९७७चा राष्ट्रीय पुरस्कार, संगीत नाटक अकादमी अधिछात्रवृत्ती (१९९८), भारत सरकारकडून पद्मभूषण (१९८४) आणि महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र गौरव (१९९९) इत्यादी पुरस्कारांनी त्यांच्या कारकीर्दीचा सन्मान करण्यात आला. विजय तेंडुलकर यांचे दीर्घकालीन आजाराने पुण्यात निधन झाले.

**–संतोष पाठारे (मराठी विश्वकोष)**

## निवडक

### खोपोली बायपासजवळ अपघात



**खालापूर :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपासजवळ असणाऱ्या नवीन बोगद्याच्या बाहेर शनिवारी नवीन बोगद्याच्या बाहेर ट्रक (एमएच ०४ एचडी २९९०) वरील चालक अनिसा (३२ रा. भिवंडी) हे ट्रक पुणे ते मुंबई जात असताना ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने पुढे जाणारा ट्रकला पाठीमागून धडकला. अपघातात दोन्ही चालक जखमी झाले. जखमी चालकांना उपचाराकरता खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातातील दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला घेत वाहतूक सुरळीत करण्यात आली. या घटनेने १५ मी वाहतूक ठप्प झाली होती.

### शुभम नलावडे झाला सीए



**माणगाव :** निजामपूर विभागातील सणसवाडीसारख्या ग्रामीण भागात राहुन कठिण परिस्थितीवर मात करून शुभम नलावडे हा वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) झाला. त्याच्या या यशाबद्दल निजामपूर विभागातुन अभिनंदनाचा वर्षाव होत असुन परिसरातील नागरिकांनी शुभम याला भेटून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शुभमचे प्राथमिक शिक्षण विळे येथे तर महाविद्यालयीन शिक्षण भवन्स कॉलेज अंधेरी येथे झाले व सीएचे शिक्षण भारतीय सनदी लेखाकार संस्थान दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया किंवा आयसीएआय येथे पुर्ण झाले.

### साने गुरुजी विद्यालयाचे स्नेहसंमेलन



**पोलादपूर :** शिक्षण म्हणजे पुस्तकातील ज्ञान नाही, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हाच खरा शिक्षणाचा मूळ गाभा आहे, असे मत ज्ञानदीप साने गुरुजी इंग्लिश स्कूल खेडचे प्राचार्य भरत मोरे यांनी भाषणात व्रुक्त केले. सहयोग प्रतिष्ठान संचलित साने गुरुजी विद्यालय लोहारे येथे १६वे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर सहयोग प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, कार्यवाह दत्तात्रय कठाळे, सहकार्यवाह सुभाष ढाणे, कोषाध्यक्ष सुखदेव मोरे विश्वस्त सुरेंद्र चव्हाण, विनय हाटे, प्रल्हाद चिविलकर, किसन सुरवसे, मुख्याध्यापिका माधवी देशमुख आदी मान्यवर शाळा समिती पदाधिकारी, पालक शिक्षक संघ, माता पालक संघ, पदाधिकारी व पालक उपस्थित होते.

### इमेज कॅलेंडरचे प्रकाशन




**अलिबाग** : इमेज कॅलेंडरच्या प्रकाशन सोहळा शुक्रवारी (दि.३) झाला. या वेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, अलिबाग नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, किहीम ग्रामपंचायतीचे सरपंच पिंट्या गायकवाड, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सिनिअर मॅनेजर संदीप जगे, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, इमेज कॅलेंडरचे निर्माते रमेश कांबळे, जितू शिगवण, समीर मालोदे, परिक्षक विजय मयेकर, विकास पाटील आदी उपस्थित होते.

### पूर्वा राजे सीए परीक्षा उत्तीर्ण

**रोहे :** पूर्वा प्रशांत राजे हीनी प्रथम प्रयत्नांत सीए परीक्षा उत्तीर्ण झाल्याने तिचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. पूर्वा प्रशांत राजे हीनी प्रथम प्रयत्नांत सीए परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. कठीण आर्थिक परिस्थीतिवर मात करून पूर्वा हिनी हे यश संपादन केले. मुळातच अभ्यासु असलेल्या पुर्वा ही शाळा आणि महाविद्यालयामध्ये नेहमीच प्रथम क्रमांक पटकावत असत. तिने हे यश संपादन केल्याने पेण प्रायव्हेट हायस्कूलचे मुख्याध्यापक सदानंद धारप, मंगेश नेने, श्रीराम दातार यांच्यासह पालकांनी तिचे अभिनंदन केले आहे.



# कर्जतमध्ये आमदार महेंद्र थोरवे यांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका ठेकेदार संघटनेच्या वतीने आमदार महेंद्र थोरवे यांचा शाल, श्रीफळ आणि गौतम बुध्दांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.



सचिव उदय पाटील यांनी मागील पाच वर्षांत महेंद्र थोरवे यांनी कर्जत मतदार संघासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. त्या मुळे सर्वच ठेकेदारांना मोठ्या प्रमाणात कामे मिळाली त्या बद्दल आमदारांचे ऋण व्यक्त करून त्यांचा सत्कार करण्यासाठी सर्व ठेकेदार उपस्थित राहिल्याचे सांगितले.

जिल्हा उपाध्यक्ष भगवान चव्हाण यांनी आमदार थोरवे विकास कामांचा झंजावत उभा करून सर्वांना न्याय दिल्याचे सांगितले. संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळींबकर यांनी जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती देण्यामागील कारण सांगितले.

या वेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष संतोष भोईर, मनोहर थोरवे, संकेत भासे, संभाजी जगताप, राजेश जाधव, शरद बडेकर, उमेश म्हसे, सूर्यकांत चंचे, सुनील भालिवडे, महेश ठाकरे, भूषण भोईर यांच्या सह सर्व ठेकेदार उपस्थित होते.

---

**कर्जत :** तालुक्यातील विकासकामे पूर्ण करणारे कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांचा सत्कार हिंदू भुजवा समाजाच्या वतीने करण्यात आला. हिंदू भूजवा (भडभूंजा समाज) श्री राधाकृष्ण हनुमान मंदिर देवस्थान तर्फे हा सत्कार करण्यात आला.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या कर्जत येथील जनसंपर्क कार्यालयात हिंदू भुजवा समाज आणि श्री राधाकृष्ण हनुमान मंदिर देवस्थान देवस्थानच्या पदाधिकारी यांनी आमदार महेंद्र थोरवे यांचा सत्कार श्रीराधाकृष्ण मूर्ती भेट देऊन केला.



या वेळी शिवकिशोर गुप्ता, उमाशंकर गुप्ता, सूर्यकांत गुप्ता, शिवलाल गुप्ता, शिवसेवक गुप्ता, प्रमोद गुप्ता, सुरज गुप्ता, अमित गुप्ता, नितीन गुप्ता, गणेश गुप्ता, नागेश गुप्ता, स्वप्नील गुप्ता, दिपक परदेशी आदींसह कर्जत नगर परिषदेचे माजी नगरसेवक संकेत भासे हे उपस्थित होते.

## कर्जत तालुक्यात हरिनाम सप्ताह सुरू



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञान यज्ञ सोहळा समिती कर्जत तालुका परिसराच्या वतीने गेल्या सत्तेचाळीस वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ शनिवारी (दि.४) करण्यात आला. ११ जानेवारी २०२५ पर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात किर्तन प्रवाचनांद्वारे ज्ञानदान होणार असून एक कोटी 'जय जय राम कृष्ण हरी'हा नाम जप करण्याचा संकल्प आहे. दररोज गीता पठण, ज्ञानेश्वरी पारायण, संगीत भजने, प्रवचने, हरी कीर्तने करण्यात येत आहेत.

कर्जत मधील पोलीस ठाण्याच्या माऊली मैदानावर अखंड हरिनाम सप्ताहाचे समितीचे अध्यक्ष ह. भ. प. नथुराम हरपुडे व ह. भ. प. मारुती महाराज राणे यांच्या मार्गदर्शना खाली आयोजन कारण्यात आले आहे. पहाटेपासूनच कर्जत शहरातील विविध धर्मियांच्या मंदिरे व प्रार्थना स्थळांमध्ये जाऊन पूजन करण्यात आले. त्यानंतर मिरवणुकीने संत ज्ञानेश्वर व श्रीकृष्णाची मूर्ती पोलीस ठाण्या जवळील माऊली मैदाना पर्यंत आणण्यात आली. त्यानंतर प्रवेशद्वार पूजन करण्यात आले.

या वेळी शिवाजी भासे, संतोष वैद्य, साजन ओसवाल, संभाजी देशमुख, मिलिंद तिवाटणे, चंद्रकांत म्हसे, रामभाऊ भडसावळे, सुदाम कारले, अमोल देशमुख, ज्ञानेश्वर बागडे, ओंकार दळवी, जयेश शेलार, समीर शिंदे, माणिक हरपुडे, सिता वाघमारे, कुमुदिनी कार्ले आदी उपस्थित होते.

## विशाल दळवी यांचा सत्कार

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय लष्करात अनुशासन, शिस्त आणि नम्रात अंगी असल्याने भारत मातेची सेवा करण्याचा आनंद मिळतो, त्यामुळे प्रत्येक गावात, घरात एक जवान तयार होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन निवृत्त लष्करी जवान विशाल बापुराव दळवी यांनी केले.

विशाल बापुराव दळवी हे भारतीय लष्करात बावीस वर्षे सेवा करून एक आदर्श जवान म्हणुन हवालदार या पदावरून निवृत्त झाले, सेवा निवृत्त झाल्यावर आज ते खालापूर तालुक्यातील वरोसे गावात आल्यावर ग्रामस्थांनी त्यांचे वाजत गाजत स्वागत करून भव्य नागरी सत्कार केला. त्या प्रसंगी लष्करी जवान विशाल बापुराव दळवी सत्काराला उत्तर देताना बोलत होते. वरोसे गावच्या सीमेवर आल्यावर पंचारती करून त्यांचे स्वागत करण्यात आले. ते पुढे म्हणाले हल्ली आपल्या परिसरातील तरुण लष्करात भरती होण्यास तयार नाहीत, लष्करात भरती झाल्यावर खऱ्या अर्थाने देश सेवा करण्याची संधी मिळते, आपण तसा प्रयत्न करणार असल्याचे जवान विशाल बापुराव दळवी यांनी सांगितले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण प्रेमी, प्राणी मित्र आणि अपघातग्रस्त यांना मदत करणारे रामदास काईनकर, सरपंच पूजा तवले, ॲड. प्रमोद सुर्वे, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण बेलोसे, ग्राम पंचायत सदस्य किशोर निकाळजे, पत्रकार अर्जुन कदम, नितीन तवले, समीर बेलोसे, संजय तवले विशाल बापुराव दळवी यांचे कुटुंब, लष्करातील मित्र परिवार, वरोसे ग्रामस्थ, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्र गीताने आणि भारत मातेच्या जय जय काराने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन सुदेश महागावकर यांनी केले.



## नांदगाव विद्यालयास वॉटर कुलर व फिल्टर भेट

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील सहाय्यक शिक्षिका तन्मयी शिंदे यांच्या ५०व्या जन्मदिनाचे औचित्य साधून पार्वतीबाई महादेव सोनावणे यांच्या स्मरणार्थ तुषार शिंदे व तन्मयी शिंदे यांच्याकडून नांदगाव विद्यालयास वॉटर कुलर व फिल्टर भेट देण्यात आली.

नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि थंड पाणी मिळावे या हेतूने वॉटर कुलर व फिल्टर दिले असे तुषार शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. उद्घाटनावेळी तुषार शिंदे, तन्मयी शिंदे, पांडुरंग दिघे, प्राचार्य बबन पालवे आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.



# डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे विद्यापीठ प्राथमिक आरोग्य केंद व आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व आयसीटीसी विभाग उप जिल्हा रुग्णालय माणगाव यांच्या संयुक्त विद्यामाने शुक्रवारी (दि.३) विनामुल्य रक्त तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सीबीसी, आरएफटी, एलएफटी थायरॉईड एचबीए१सी लिपीड आणि शुगर मागील तीन महिन्यांपर्यंत व इतर चाचण्या करण्यात आल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील पदवी व पदविका विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी यांना सदर शिबिराचा मोठया प्रमाणात लाभ घेतला.

हे शिबिर यशस्वी करण्याकरीता विद्यापीठाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या समन्वयक डॉ. सोनाली म्हात्रे, वैद्यकीय अधिकारी डॉ. मंजुषा नलबलवार व डॉ. त्रिशिला वाघमारे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व कर्मचारी तसेच उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. सदरचा कार्यक्रम हा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, अधिष्ठाता डॉ. संजय नलबलवार व डॉ. सचिन पोरे व इतर अधिकारी यांच्या मार्गदर्शनानने पार पाडण्यात आला. विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीकोनातून घेण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व परिसरातून कौतुक होत आहे.



## Public Notice

MACP. NO. 228/2023
Extn.18
Process Paid Rs.15/-
Adv. R.M. Bhale

IN THE COURT OF THE HON'BLE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, SANGLI, AT SANGLI.

1. Shri. Sunanda Ravindra Chavan, ........ Petitioners.
Vs.
1. Gorakh Laxman Shinde, ........ Respondents.
Petition - M.V. Act, 1988 Sec. 166,
Claim amount Rs. 13,92,500/-

The respondent No. 1 Shri. Gorakh Laxman Shinde, Age 51, Occu Trader, R/o. KL-02/28/08 Sector-06-E, Kalmboli, Node, Tal Panvel, Dist - Raigad.

The petitioners had filed an application i.e. MACP No.228/2023, for compensation under Sections 166 of the Motor Vehicles Act and claimed an amount of Rs. 13,92,500/-. The petitioners had added you as respondent No.1 in the said matter as a driver & owner of the Trailer No. MH-46-AR-6309. The said case is filed in M.A.C.T., Sangli. The said accident was occurred on 11/06/2023 at about 06.15 a.m. on Pune- Bangalore road. The notice was issued to your known address through Court, but it returned un-served. Hence, by this notice it is informed to you to appear before the Hon'ble Tribunal personally or by duly appointed advocate with all relevant documents on 10/02/2025 at 10.30 a.m., and you may give W.S. on the said date. If you do not do as per mentioned above then, the application under Sec. 166 will be decided ex-parte against you. Kindly take note of the same. The said notice is given by my signature and seal of the Court on 04/01/2025, SANGALI

Date: 04/01/2025

| Sd/-<br>Jr. Clerk.<br>Dist. Court, Sangli. | COURT SEAL | Sd/-<br>Supdt<br>Dist. Court, Sangli. |
|---|---|---|

## Public Notice

MACP. NO. 229/2023
Extn.18
Process Paid Rs.15/-
Adv. R.M. Bhale

IN THE COURT OF THE HON'BLE MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL, SANGLI, AT SANGLI.

1. Shri. Ravindra Dattatraya Chavan, ........ Petitioners.
Vs.
1. Gorakh Laxman Shinde, ........ Respondents.
Petition - M.V. Act, 1988 Sec. 166,
Claim amount Rs. 15,72,000/-

The respondent No. 1 Shri. Gorakh Laxman Shinde, Age 51, OccuTrader, R/o. KL-02/28/08 Sector-06-E, Kalmboli, Node, Tal - Panvel, Dist - Raigad.

The petitioners had filed an application i.e. MACP No.229/2023, for compensation under Sections 166 of the Motor Vehicles Act and claimed an amount of Rs. 15,72,000/-. The petitioners had added you as respondent No.1 in the said matter as a driver & owner of the Trailer No. MH-46-AR-6309. The said case is filed in M.A.C.T., Sangli. The said accident was occurred on 11/06/2023 at about 06.15 a.m. on Pune- Bangalore road. The notice was issued to your known address through Court, but it returned un-served. Hence, by this notice it is informed to you to appear before the Hon'ble Tribunal personally, or by duly appointed advocate with all relevant documents on10/02/2025 at 10.30 a.m., and you may give W.S. on the said date. If you do not do as per mentioned above then, the application under Sec. 166 will be decided ex-parte against you. Kindly take note of the same. The said notice is given by my signature and seal of the Court on 4/01/2025 SANGLI

Date: 04/01/2025

| Sd/-<br>Jr. Clerk.<br>Dist. Court, Sangli. | COURT SEAL | Sd/-<br>Supdt<br>Dist. Court, Sangli. |
|---|---|---|

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे-मोहो, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्क व ताबाकब्जा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. सदर शेत जमिन आमचे आशिल कायम स्वरूपी खरेदीखताने विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र | कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | मारुती आल्या पाटील | १०५ | २ | ०-२५-०० | ४.३१ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु. साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**तारीख : ०४/०१/२०२५**

**सही/-**
**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केटजवळ, पनवेल.
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.
मो. ९८३३३०६३६१.

## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका खालापूर पैकी गांव वडवळ येथील **श्री. उदय द्वारकानाथ राजपुरकर व सौ. नेहा उदय राजपुरकर** यांचे मालकीची भूमापन क्रमांक ७२अ/१/अ/४४, क्षेत्र ०-२७-३० हे. आर्. पॉ. ही मिळकत आमचे अशिल **मे. बेकबेस्ट फूड्स प्रा. लि. वडवळ, तालुका खालापूर, जिल्हा रायगड** यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व त्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी सुरू आहेत असे त्यांनी सांगितले आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदीव्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**तारीख : ०४/०१/२०२५**

**सही/-**
**ॲड. श्रीराम प्रमोद ठोसर**
**मु. बी-४ लक्ष्मी व्हीला सोसायटी, ब्राह्मण आळी,**
**अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**
**ई-मेल :** spthosar१९९०@gmail.com

# सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

## गव्हाण विद्यालयात बालिका दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले.



हा कार्यक्रम इयत्ता आठवी अ च्या वतीने साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून आलेली इयत्ता पाचवी ब मधील विद्यार्थिनी काव्या पाटील हिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनीही प्रतिमा पूजन केले. बालिका दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील संगणक शिक्षिका सोनाली घरत यांनी श्रीफळ अर्पण केले. या वेळी ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील, सुजाता शेलार, ज्योत्स्ना कोळी, दर्शना भोईर, सोनाली घरत आदी उपस्थित होते.

या वेळी याज्ञिक मोकल, यज्ञ मोकल, स्मीत म्हात्रे आणि गायकवृंदांनी सावित्री नमन गायिले. या वेळी श्रीधर सुतार, सिमरन डाकवे, श्रेया साळुंखे, मोक्षदा साळुंखे, तनुश्री गुळवे, दिव्या केंद्रे ह्या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सूत्रसंचालन वर्गाच्या वर्ग शिक्षिका आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी केले तर विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी आभार मानले.

## पनवेल महापालिका व शाळांमध्ये अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, लेखा परिक्षक संग्राम ऱ्होरकाटे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, लेखा परिक्षक संदिप खुरपे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सर्व शाळांमध्ये मराठी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेच्या सर्व मराठी शाळांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी शाळांमध्ये भाषण व नृत्य, वेशभूषा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ७ तक्का येथे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनानुसार व पनवेल महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण यांच्या प्रेरणेने व अधीक्षक कीर्ती महाजन व शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या सावळे यांच्या नियोजनानुसार सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका संगीता गवारे व इतर सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली बाल सभेचे आयोजन करण्यात आले. शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर अशी बालसभा घेऊन भाषणांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट व कार्य इतर सर्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी बालसभेमध्ये सहभागी होऊन बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

## निवडक

### संजय पवार यांना पुरस्कार

**नवी मुंबई, पनवेल :** ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे अध्यक्ष संजय पवार यांना शिवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात



आला. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन शिवबा विचार प्रचार प्रसारक मंडळ ट्रस्टतर्फे किल्ले रायगड येथे त्यांचा गौरव करण्यात आला. देशा बाहेर अडकलेल्या १५ हजारांपेक्षा जास्त कामगारांना मायदेशी परत आणायचे कार्य हे संजय पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून केले आहे. त्यावेळी छत्रपती शिवरायांच्या समाधीचे पुजारी शिवसंत कृष्णाजी पाटील, विजय खिलारे, नूतन खिलारे, वैभव घरत, नितीन गोरडे, अमर रणवरे आदी उपस्थित होते.

### आपटे केंद्राची शिक्षण परिषद

**मोहोपाडा :** रसायनी आपटे केंद्राची शिक्षण परिषद राजिप



शाळा कालिवली येथे झाली. शिक्षण परिषद कालिवली शाळा व बागेचीवाडी या दोन शाळांमध्ये आयोजित केली होती. केंद्रप्रमुख अविनाश पाटील व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शोभा वाघे, मंगेश म्हात्रे आदींच्या हस्ते जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. केंद्रप्रमुखांनी प्रशासकीय विषयावर चर्चा केली. शिक्षकांनी शिष्यवृत्ती पाचवी व संगणक प्रणाली या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. भानुदास पवार यांनी आभार मानले.

### सुभाष गायकवाडांना डॉक्टरेट पदवी



**उरण :** सामाजिक कार्यकर्ते सुभाष गायकवाड हे शिक्षण क्षेत्रात २५ वर्ष उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा मेक्सिको अमेरिका या अतिशय नामांकित असलेल्या विद्यापीठाकडून द डिग्री ऑफ डॉक्टर ऑफ एज्युकेशन, डॉक्टरेट पदवी देऊन, डॉ. व्ही .कट्टा बोमन कंट्री डायरेक्टर इंडिया युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा मेक्सिको अमेरिका यांच्या हस्ते सुभाष गायकवाड यांना सन्मानित करण्यात आले आहे. सध्या सुभाष गायकवाड हे विश्वभारती हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कोपरखैरणेचे प्रमुख आहेत. तसेच भाजप जिल्हा सरचिटणीस अनुसूचित जाती मोर्चा नवी मुंबई या पदावर कार्यरत आहेत.

## 'सावित्रीबाई फुलेंच्या कार्याने पुरुषांनाही प्रेरणा'



**उरण : वार्ताहर**

भारताच्या पाहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरित्राचा अभ्यास केवळ स्त्रियांनाच नव्हे तर पुरुषांनाही प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे सावित्रीबाई फुले जयंतनिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्य वक्ते म्हणून डॉ.संदीप घोडके यांनी बोलताना केले.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर उपास्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात उपस्थित विद्यार्थ्यांना आजच्या काळातील संघर्षाची सोडवणूक करण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाईं फुलेंचे चरित्राचा अभ्यास करणे कसे आवश्यक आहे आणि ती आजच्या काळाची गरज आहे, असे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी शिक्षण, समाज, आदी क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या महत्वपूर्ण सुधारणांचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतीक विभगाच्या प्रमुख डॉ. सुजाता पाटील यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.प्रांजल भोईर यांनी केले तर आभार प्रा. योगेश कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीधी पाटील, प्रितेश मडवी, बबिता राजभर आदी विद्यार्थ्यानी मेहनत घेतली.

व्याख्यानाच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खारघर येथे मार्गदर्शन कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या नागोठणे, तळोजे, पापडीचा पाडा, कोयनावेळे, खारघर, येथील नेल्सन मंडेला स्कुल, जी. के. डोंगरगावकर अजिंठा इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी मार्गदर्शन केले. रांगोळी, वेषभुषा, चित्रकला, ज्योतिबा फुले कविता पाठांतर, भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि आजची प्रासंगिकता यावर प्राचार्या नेहा राणे, मुख्याध्यपिका नेहा कपोते यांनी मार्गदर्शन केले.



प्रारंभी प्रास्ताविक प्रा. रक्षा लाडे यांनी केले तर सूत्र संचालन एम. एल. सूर्यवंशी यांनी केले. या वेळी विविध स्पर्धा सुजाता भोसले, प्रमिला सणस, आशा शिंदे, अंकुश कांबळे, कवल तलवार, वनिता सूर्यवंशी यांनी राबविल्या. रत्नमाला डोंगरगावकर यांनी शाळेतील शिक्षकांचा सन्मान पुष्पगुच्छ देऊन केला. संगीत जोगसह यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## शाळा आणि कॉलेजमधील विद्यार्थ्यांना पोलिसांकडून मार्गदर्शन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिशा महिला सामाजिक सामाजिक संस्था व कामोठे पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा व कॉलेज मधील विद्यार्थ्यांकरिता मोबाईलच्या विळख्यात अडकलेली तरुणाई व सायबर क्राईम तसेच मुलींवरील अत्याचार व घ्यावयाची खबरदारी या विषयावर सत्र आयोजित केले होते.

या सत्रात सोशल मीडियाच्या वापराविषयी जागरूकता, मोबाईलचा गैरवापर व त्याचा मानसिक आरोग्यावर दुष्परिणाम व प्रभाव, सायबर सुरक्षा, सायबर गुन्हा व प्रकार, मानसिक आरोग्य जागरूकता अभियान, मुलींच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या मार्गदर्शक सूचना तसेच शारीरिक बदलामुळे होणारे परिणाम यासारख्या विविध विषयांचा समावेश करण्यात आला.

या सत्रात सोशल मीडिया च्या गैरवापरामुळे सायबर गुन्हेगारी किंवा सायबर जागरूकता या विद्यार्थामध्ये कशी पसरवली जाऊ शकते, याबाबत विविध उदाहरणे देऊन जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जेणेकरून ते आगामी भविष्यात एक चांगले आणि जबाबदार नागरिक बनू शकतील यावर सेशन घेण्यात आले. सकारात्मक प्रतिसादात एकंदरीत हे सत्र अतिशय यशस्वीरीत्या संपन्न झाले.

रामशेठ ठाकूर स्कूल व जुनिअर कॉलेज कामोठे तसेच स्व. दि. बा. पाटील स्कूल येथे या सेशन ची सुरुवात करण्यात आली. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक कामोठे सन्माननीय विमल बिडवे मॅडम, वशिष्ठ कागणे पोलीस उपनिरीक्षक, युवा व्याख्याते ॲड विवेक भोपी व डॉ. कल्याणी पात्रा यांनी उत्तम मार्गदर्शन केले. या वेळी सौ निलम आंधळे विद्या मोहिते तसेच पोलीस हवालदार दिगंबर होडगे शाळेच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे व कोऑर्डीनेटर सारिका लांजूडकर या वेळी उपस्थित होते. असे शिबिर राबवण्यासाठी ॲड.सिद्धार्थ इंगळे, सन्मानीय नाना पडाळकर, निषद राऊत, सन्माननीय पंकज सूर्यवंशी, डॉ. साक्षी सचदेव, डॉ सुवर्णा चोपडे यांच्या मार्गदर्शनाने इतरही शाळेत असे जनजागृती चे शिबीर राबवले जाणार आहेत.



## गव्हाण विद्यालयात सर्वाधिक ग्रंथवाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाचन संस्कृतीला गतिमान करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांवर शालेय जीवनातच वाचनाचे संस्कार घडवून त्यांना वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ग्रंथालयाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. विविध उपक्रमांमध्ये या शैक्षणिक वर्षात सर्वाधिक ग्रंथ वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्या वतीने भेट वस्तू प्रदान करून गौरविण्यात आले.

यावर्षी लहान गटात सर्वाधिक ग्रंथ वाचन करणाऱ्या विद्यार्थीनी आरोही नाळे हिला सर्वाधिक ग्रंथ वाचन केल्याबद्दल प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते भेटवस्तू प्रदान करून गौरविण्यात आले. तर द्वितीय क्रमांक प्राप्त करणारी विद्यार्थीनी इयत्ता सहावी ब या वर्गातील कुमारी आलिया खान हिला विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचे शुभहस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे ज्येष्ठ मुख्याध्यापखक गोवर्धन गोडगे यांचेसह ग्रंथपाल महेश म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेजचे राजेंद्र चौधरी तसेच सेवक अरुण कोळी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व लॅकलांड केमिकल इंडिया लिमिटेड माडप तसेच खालापूर टाटा मेमोरियल कॅन्सल सेंटर हॉस्पिटल खारघर यांचा संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

या वेळी कंपनीतील पन्नासहून अधिक कामगारांनी रक्तदान हेच श्रेष्ठदान समजून रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या



कामगारांना प्रशस्तिपत्र वाटप करण्यात आले. शिबिर लॅकलांड केमिकल इंडिया लिमिटेडचे मालक कन्हैयालाल जैन यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित केले होते. शिबिरमध्ये मुखर्जी सीईओ, नंदी साहेब जनरल मॅनेजर, राजेंद्र पाटील, एच.आर. मेजर, अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व टाटा कॅन्सल सेंटर हॉस्पिटल खारघर येथील डॉक्टर उपस्थित होते.

## पनवेलमधील १७ ठिकाणी जलजीवन मिशनचे काम पूर्ण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जलजीवन मिशन योजनेची गाडी पनवेलमध्ये संथ गतीने सुरू आहे. आत्तापर्यंत १३३ पैकी केवळ १७ ठिकाणचीच कामे पूर्ण स्थितीत आहेत. तर ५७ ठिकाणची कामे सध्या बंद स्थितीत असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली.

पनवेल तालुक्यातील आंबे तर्फे तळोजे, आंबिवली, चिखले, दापिवली, दिघाटी, जांभिवली, कल्हे, कराडे बुद्रुक, करंबेळी तर्फे तळोजे, खानाव, मोहोदर, मोहपे, नितळस, सांगडे, शिवकर, वांगणी तर्फे तळोजे, वांगणी तर्फे वाजे या १७ ठिकाणची कामे १०० टक्के पूर्ण झाली असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. तर आजीवली, भिंगारवाडी, सोमटणे, वडघर या ठिकाणी शून्य टक्के काम आहे.

शून्य ते पंचवीस टक्के कामांपैकी आदई येथील सुरू आहे. सोमटणे येथे फेरनिविदा काढण्यात येणार आहे. बरेचशा गावांमध्ये केवळ साठवण टाकीचे, वितरण वाहिनीचे, ऊर्ध्व वाहिनी, गुरुत्ववाहिनीचे काम झालेले असून सद्यस्थितीत ५७ कामे बंद आहेत. तर काही ठिकाणी फेरनिविदा काढण्यात येणार आहेत. काही ठेकेदारांच्या कामाची मुदत संपलेली आहे. वेळेवर काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : समुद्रकिनारी छोट्या बोटींमध्ये बॅटऱ्या व मोबाईल चार्जिंगसाठी सोलरचा वापर होऊ लागला आहे. पंतप्रधान मोदींनी केलेल्या आवाहनला कोळी बांधव साथ देत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## करंजाडेतील तीन विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कामगिरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पामा ग्लोबलद्वारे आयोजित २२व्या पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. ही स्पर्धा व्हिएतनाममध्ये झाली आणि २८ देशांतील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. अभिमानाची बाब म्हणजे भारतामधून ७४ विद्यार्थ्यांची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली होती.

पामा इंडिया या संस्थेने भारतातून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी निवडले होते



आणि त्या यादीत नवी मुंबई APPL ABACUS (करंजाडे) चे तीन विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत भारताला अभिमानास्पद स्थान मिळवून दिले.

सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीला फळ आलं आणि त्यात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली ती विद्यार्थिनी रिधिमा सोराठीया हिने, जिच्या कर्तृत्वामुळे तिने प्रथम क्रमांक जिंकले. त्याचप्रमाणे भार्गवी घुगारे आणि अनवेशा राजेशिर्के यांनी दुसरा क्रमांक यांनी मिळवून भारताचे नाव उज्ज्वल केले.

ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीमत्तेचा आणि चातुर्याचा योग्य ठिकाणी उपयोग करण्याची संधी देते. या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षक सोनाली पिंगळे व आबिदा मकांदार यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढली. याशिवाय, त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अनुभवामुळे त्यांना भविष्यात आणखी मोठ्या यशाची संधी मिळणार आहे.

# कर्जतमध्ये हुतात्म्यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

## हुतात्मा स्मारक समितीकडून इतिहासाचे स्मरण - आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील दोन क्रांतिकारकांनी देशाला स्वतंत्र मिळावे यासाठी बलिदान दिले. ही घटना कर्जत तालुक्याला अभिमान वाटावी अशी असून तालुक्यात हुतात्मा स्मारक समितीकडून इतिहासाचे स्मरण करण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या ८२व्या स्मृतिदिनानिमित्त नेरळ येथे हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने सिद्धगड बलिदान दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण-कर्जत रस्त्यावरील हुतात्मा चौक येथे आयोजित या कार्यक्रमाला माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे, निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत, पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे, माजी सभापती अमर मिसाळ, नेरळ ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर,



माजी उपसरपंच मंगेश म्हसकर, निवृत्त जवान कुमार जाधव, किरण कांबरी, अर्जुन शिंदे, चित्रकार पराग बोरसे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती रामचंद्र ब्रम्हांडे, शरद भगत, सायकलपटू हिरेन हिसालके, हुतात्मा गौरव पुरस्कारकर्ते भजन भूषण गजाननबुवा पाटील आणि गीतकार अनंत पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत स्मारक समिती अध्यक्ष संतोष पेरणे आणि विजय मांडे यांनी केले. पेरणे यांनी प्रास्ताविकही केले. त्यानंतर माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते भजनभूषण गजाननबुवा पाटील यांचा हुतात्मा गौरव मरणोत्तर पुरस्कार त्यांचे कुटुंबीय प्रसाद पाटील, सुचिता वांजळे आणि संगीता पाटील यांनी स्वीकारला, तर गीतकार अनंत पाटील यांच्या कन्या छाया पाटील तसेच अन्य दोन्ही कन्या आणि जावई यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. निवृत्त जवान आणि सर्व शाळांचा हुतात्मा भिडू कोतवाल आणि हिराजी पाटील यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सुरेश लाड यांनी, हुतात्मा चौकात येऊन हुतात्म्यांना अभिवादन करण्याचा पायंडा कायम असून हुतात्मा गौरव पुरस्कार विजेत्यांची नावे पाहिल्यावर हुतात्मा गौरव पुरस्काराचे महत्व अधोरेखित होत आहे, असे सांगितले.

या कार्यक्रमास महसूल मंडळ अधिकारी संदीप भंडारे, माजी उपसभापती जयवनाती हिंदोळा, आदिवासी संघटना कर्जत तालुका अध्यक्ष परशुराम दरवडा, उपसरपंच किशोर घारे, माजीउप सरपंच बल्लाळ जोशी, अंकुश शेळके, केतन पोतदार, कृष्णा शिंगे, नेरळ कोतवाल वाडी ट्रस्ट अध्यक्ष संध्या देवस्थळे, विश्वस्त बाळकृष्ण पादीर, नेरळ विद्या मंदिर मंडळाचे विश्वस्त डॉ मिलिंद पोतदार, नेरळ व्यापारी फेडरेशन अध्यक्ष मनोहर आयरे, माजी अध्यक्ष अरविंद कटारिया, नेरळ रेल्वे प्रवासी संघटना अध्यक्ष संदीप म्हसकर, भाजप महिला तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, शिवसेना महिला उपतालुकाप्रमुख वर्षा बोराडे, नेरळ शहर प्रमुख प्रभाकर देशमुख, संपर्कप्रमुख किसन शिंदे, शहरप्रमुख बंडू क्षीरसागर, निवृत्त शाखा अभियंता सूर्यकांत चंचे, मुख्याध्यापिका शैलजा निकम, विनया काकडे, नंदकुमार इकारे, आसावरी काळे, प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे, नेरळ परिसर ग्रुपचे अध्यक्ष सुनील राणे, नेरळ जेष्ठ नागरिक संघ माजी अध्यक्ष सावळाराम ठाकूर, किशोर चावरे, भारती कांबळे, राजेश मुरकुटे, शिवराम महाराज तुपे, उपतालुकाप्रमुख शशिकांत मोहिते, माजी सरपंच भाई क्षीरसागर, माजी सदस्य श्रद्धा कराळे,संतोष शिंगाडे, राजू झुगरे, विलास हजारे, संतोष धुळे, अर्जुन तरे, जैतू पारधी, पाटील, माधव गायकवाड आदी उपस्थित होते.

## पोलादपुरात गाय वासराची वाहतूक करणाऱ्या टेम्पोसह दोघे ताब्यात

**पोलादपूर : प्रतिनिधी**



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पुलावरून रात्रीच्या वेळी एका मिनी पीकअप टेम्पोमधून दाटीवाटीने जर्सी गाय आणि वासरू यांची वाहतूक पोलिसांनी पकडली. या प्रकरणी मद्यपी आणि विनालायसन्स चालकाला आणखी एका व्यक्तीसोबत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलीस हवालदार दिलीप सारंगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १ जानेवारी २०२५ रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास पोलादपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विशाल भिमराव निकम (वय २७, सातारा,) आणि धर्मेंद्र नारायण देव (वय ५६, सिद्धनाथ वाडी, ता. वाई, जि. सातारा) हे दोघे मिनी पीकअप टेम्पोमधून ( एमएच ११ सीजे ५३३२) दाटीवाटीने जर्सी गाय आणि वासरू यांची पशू वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तपासणी अहवालाशिवाय बेकायदेशीर वाहतूक करीत होते. या वेळी दोघांनीही मद्यपान केल्याचे ब्रिथ ॲनालायझरद्वारे केलेल्या तपासणीत निदर्शनास आले तसेच वाहन चालकाकडे ड्रायव्हिंग लायसन्स आढळून आले नाही.


पांढऱ्या लाल रंगाचा मिनी पिकअप टेम्पो किंमत पाच लाख रुपये आणि जर्सी गाय ८० हजार रुपये, जर्सी गायीचे वासरू १० हजार रुपये असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून अधिक तपास सुरू आहे.

## नरेंद्राचार्य महाराज सांप्रदायातर्फे रक्तदान शिबिरे

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. यंदाही ४ ते १९ जानेवारीपर्यंत रक्तदान महायज्ञाचे दक्षिण रायगडमधील विविध ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल, हिमोफेलिया, थॅलेसेमिआ, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर, नेमियाचे पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत गरज आवश्यकता असते. यासाठी शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्तबाटल्या देण्याचे सांप्रदाया मार्फत निश्चित केले आहे.



रक्तदान शिबिर माणगाव तालुक्यात ७ जानेवारी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र गोरेगाव येथे, ११ जानेवारी उपजिल्हा रुग्णालय माणगाव, तळा तालुक्यात ४ जानेवारी ब्राम्हण सभा हॉल तळा, मुरूड तालुक्यात ५ जानेवारी बापदेव मंदिर वळके, ११ जानेवारीला आगरी समाज हॉल मजगाव उसरोल टेप, श्रीवर्धन तालुक्यात ४ जानेवारी श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय, ११ जानेवारी बोर्ली पंचतन श्रीवर्धन, १३ जानेवारी संत निरंकार सत्संग हॉल भरडखोल, महाड तालुक्यात ११ जानेवारीला जनकल्याण रक्तपेढी महाड, १९ जानेवारी आरोग्य केंद्र विन्हेरे जनकल्याण रक्तपेढी, म्हसळा तालुक्यात १८ जानेवारी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसळा असे नियोजन करण्यात आले. या ठिकाणी नागरिकांनी आपले अमूल्य रक्तदान करावे, असे आवाहन नरेंद्राचार्य महाराज सांप्रदाय दक्षिण रायगड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अदानी फाउंडेशनच्या माध्यमातून शाळांसाठी विविध उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

राजपुरी येथे नुकतेच अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लि. अंतर्गत रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा येथे विविध उपक्रमांचे उद्‌घाटन झाले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक, मुरूड तालुका गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, राजपुरी सरपंच सुप्रिया गिदी, उपसरपंच इस्माईल सिद्दीकी, सदस्य अलका मोन्नाक, महेंद्र आंबटकर, सुनंदा कुणबी, कोळी समाज महिला मंडळ अध्यक्ष



कल्पना आगरकर, केंद्रप्रमुख जितेंद्र मकु, मुख्याध्यापिका सुचेनी पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जागृती आगरकर, उपाध्यक्ष यामिनी आंबटकर तसेच अदानी फाउंडेशनच्या डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे आणि अवधूत पाटील, एकात्मिक बालविकास विभागाचे सर्व पदाधिकारी, सर्व शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती.

डिजिटल शिक्षणाचा प्रचार आणि अंगणवाडींचे नूतनीकरण या संकल्पनेतून अदानी फाउंडेशनच्या वतीने राजपुरी परिसरातील आठ शाळांना डिजिटल स्कूल किट प्रदान करून डिजिटल शिक्षणाला चालना देण्यात आली. त्याचबरोबर राजपुरी मराठी शाळेतील एका वर्गाचे नूतनीकरणसुद्धा करण्यात आले. अंगणवाड्यांच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी राजपुरी येथील चार आणि कुडगाव येथील दोन अशा एकूण सहा अंगणवाड्यांमध्ये बाला पेंटिंग अंतर्गत सुंदर रंगरंगोटी करण्यात आली होती.

अदानी फाउंडेशनच्या माध्यमातून डिजिटल शाळा एकूण आठ करण्यात आलेल्या आहेत. राजपुरी, आगरदांडा, एकदरा, मिठागर, टोकेखार इत्यादी भागात डिजिटल शिक्षण सुरू केले आहे.राजपुरी, अंगणवाडी, नवेनगर, सुंदरनगर, कोळीवाडा आणि मुस्लिम मोहल्ला येथील अंगणवाड्या बाला पेंटिंगने सजवल्या आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रल्हाद गोंजी यांनी केले, तर सखी प्राजक्ता अडूळकर व राजपुरी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले.

## नज अकॅडमीमध्ये सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

**मुरूड : प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, शिक्षण प्रसारक, थोर समाजसेविका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंती अर्थात महिला दिनानिमित्त मुरूड तालुक्यातील मजगावच्या नज अकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या मेघा भंडारे, एचओडी प्रितम वाळंज, समन्वयक दिलशाद दामाद, मनाली पाटील, आशिष बुल्लु व अन्य शिक्षक तथा कर्मचाऱ्यांनी सावित्रीबाईंना आदरांजली वाहिली, तर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या महान कार्याची महती सांगणारी भाषणे केली.



## कराओके स्पर्धा

**अलिबाग :** लायन्स क्लब अलिबागतर्फे आयोजित लायन्स फेस्टिवल २०२५मध्ये हौशी व व्यावसायिक गायक कलाकारांसाठी कराओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.


२३ ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान होत असलेल्या या महोत्सवात २३ जानेवारी २०२५ रोजी लायन्स अलिबाग कराओके आयडॉल स्पर्धा महाअंतिम सोहळा होणार आहे. सोलो आणि ड्यूएट अशा दोन्ही प्रकारात घेण्यात येणारी ही स्पर्धा १५ वर्षे वयावरील सर्व हौशी तसेच व्यावसायिक कलाकारांसाठी खुली आहे. विजेत्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत.


## मुरूडचा इतिहास पुस्तक रूपाने उलगडणार; दोन पुस्तकांचे आज प्रकाशन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्याला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या इतिहासाच्या खोलात जाऊन तो पुस्तकरूपाने उलगडण्याचा प्रयत्न मुरूडच्या दोघांनी केला आहे. प्रीतम सुरेश वाळंज व अनिकेत अशोक पाटील अशी या दोन लेखकांची नावे असून रविवारी (दि. ५) पद्मदुर्ग किल्ल्यात होणाऱ्या पद्मदुर्ग जागर कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या दोन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे.

'मरुत्क्षेत्र ते मुरूड इतिहासाचा पुरातत्वीय मागोवा' हे पुस्तक प्रा. प्रीतम वाळंज यांनी लिहिले असून 'श्री शिव छत्रपतींचा पद्मदुर्ग' हे पुस्तक अनिकेत पाटील यांनी लिहिले आहे. मुलुखगिरी प्रकाशन कोल्हापूर हे या पुस्तकांचे प्रकाशक आहेत.






पद्मदुर्ग जागर कार्यक्रमाला राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, खासदार सुनील तटकरे, आमदार महेंद्र दळवी उपस्थित राहणार आहेत.


## मुंबई ते नेरळ सायकल प्रवास पूर्ण केला चार तास ४६ मिनिटात

११ वर्षीय हिरेनची कामगिरी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील क्रांतिकारक हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना अभिवादन करण्यासाठी तसेच हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर राष्ट्रीय स्मारक बनविण्यात यावे यासाठी नेरळ गावातील ११ वर्षीय हिरेन राम हिसालके या बालकाने मुंबई ते नेरळ असा १०० किलोमिटर प्रवास सायकल वरून केला. दरम्यान, अवघ्या चार तास ४६ मिनिटात हा सायकल प्रवास पूर्ण केल्याने त्याचे कौतुक होत आहे.

नेरळ गावातील हिरेन या ११ वर्षीय सायकलपटूने दोन जानेवारी रोजी देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपल्या प्राणाची आहुती देणारे हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मृतिदिन निमित्त सायकल फेरी काढली. त्यात माथेरान येथील हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर राष्ट्रीय स्मारक बनवावे



या मागणीसाठी हिरेन याने सकाळी मुंबई येथून पाच वाजून ३५ मिनिटांनी सायकलवरून प्रवास सुरू केला आणि हुतात्मा चौक येथे स्तंभाला अभिवादन केले. मुंबई झोपलेली असताना हिरेन याने सायकल प्रवास सुरू केला. पुढे हुतात्मा चौकातून शिवडीवरून फ्री वे ने चेंबूरला छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून हिरेनची सायकल वाशी पुलावरून कोकण भवन आणि नंतर कळंबोली सर्कल असा प्रवास सुरू होता.

कळंबोलीवरून पनवेल येथून चौक असा प्रवास त्याने सकाळी नऊ वाजता पूर्ण केला. चौक येथून कर्जत रस्त्याने कर्जत आणि नंतर कल्याण रस्त्याने नेरळ असा प्रवास फक्त चार तास ४६ मिनिटात पूर्ण केला.

हिरेनने ही सायकल फेरी पूर्ण केली त्यावेळी हुतात्मा चौकात नेरळमधील अनेक लोक उपस्थित होते. त्यात अंकुश शेळके, मंगेश म्हसकर, चंदन भडसावळे, संदीप म्हसकर, शाळेच्या मुख्याध्यापिका विनया काकडे, मनोहर हजारे, सुभाष नाईक, श्रद्धा कराळे, धनंजय थोरवे, परशुराम दरवडा, हेमंत चव्हाण, मिलिंद विरले, संजय घाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नेरळ पोलीस ठाण्याकडून सुरक्षा देण्यात आली होती.या प्रवासात दुचाकीवरून काका ॲड विपुल हिसालके, वडील राम हिसालके,वैभव हिसालके, प्रकाश धुळे, रोशन धुळे, मंगेश बिराडे, विघ्नेश हिसालके यांनी त्याला सोबत केली.

# पोलादपूरमध्ये ड्रॅगन फ्रूटस्‌ची शेती

## मुंबईतून गावी परतलेल्या तरुणाचा यशस्वी प्रयोग

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कोरोना लॉकडाऊननंतर मुंबईतून पोलादपूर तालुक्यातील नाणेघोळ गावात परतलेला अमर राजेंद्र कदम हा तरुण गेल्या तीन-चार वर्षांमध्ये प्रचंड मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ड्रॅगन फ्रूटसचे उत्पादन घेत आहे. त्याचप्रमाणे तो गावाकडून मुंबईत नोकरी-धंद्यासाठी जाणाऱ्या तरूणांना गावाकडे प्रायोगिक शेती करण्याचा संदेश देत आहे.

कोरोना काळात अनेकांच्या आयुष्याची दिशा बदलली. तेव्हा अमर कदम या तरुणाचे पदवीचे शिक्षण सुरू असताना वडील राजेंद्र कदम यांनी अमरला गावाकडे शेती करून उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्याचा सल्ला दिला. लहानपणी चिखलमाती हाताला लागली तरी किळस वाटणारा अमर या सल्ल्यामुळे विचारात पडला. यानंतर अमरने पोलादपर तालुक्यातील उताराच्या जमिनीवर ठिबक सिंचनाद्वारे पाणी उपलब्ध करून घेता येणाऱ्या पिकांचे



प्रयोग करण्याचे ठरविले. त्याने पारंपरिक भातशेती करण्याऐवजी सुरुवातीला कलिंगड, अननस, झेंडूची फुले अशी पिके घेतली. याच काळात ड्रॅगन फ्रूटस्‌च्या शेतीचा विचार अमरला शेती माती आणि हवामानाच्या अभ्यासामुळे सुचला.

पोलादपूर तालुका कृषी विभागाचे मोरे, गुंड आणि भरत कदम यांनी अमरला ड्रॅगन फ्रूटसची शेती करण्याचा अभिनव प्रयोग करण्यासाठी रोपे मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केले. पंचायत समिती कृषी विभागाचे अरुण धीवरे यांनी कुंपणासाठीचे अनुदान देण्याची तयारी दर्शविली, परंतु ते नम्रपणे नाकारून अमरने स्वयंप्रेरणेने या प्रायोगिक शेतीमध्ये तन-मन झोकून काम सुरू केले. कुंपणासाठी सिमेंट पोल आणि जाळ्यादेखील अमरने शेतावरच तयार करून जोडधंदा सुरू केला.

वर्षातून दोन वेळा या रोपांची वाढ होऊन पावसाळ्यामध्ये फळांचे उत्पादन होण्याची वेळ आल्यानंतर अमरला दीड वर्षामध्ये फारसे खर्च व उत्पन्नाचे समीकरण जमून आले नसले तरी त्यानंतर दोनच वर्षांमध्ये खर्च वजा जाता दुप्पटीने निव्वळ नफा सुरू झाला. ही शेती २५ वर्षांपर्यंत दुपटीने उत्पन्न देणारी आहे तसेच ड्रॅगनचे झाड हे निवडुंग प्रकारचे असल्याने या झाडाला रोग बुरशी व करपा होण्याची शक्यता नसते, अशी माहिती अमरने या वेळी दिली.

### शेतीमध्ये विविध प्रयोग

**अमरने गेल्या तीन-चार वर्षांमध्ये वाडवडिलांच्या जमिनीवर ड्रॅगन फ्रूटव्यतिरिक्त आंब्याची फळबाग तसेच लिंबांची बाग लावून काही वेगळ्या रोपांचे प्रायोगिक तत्वावर संवर्धन सुरू केले आहे. मुंबईचा अमर आता खेड्यात रमल्याने सुरुवातीला तो मुंबईची वाट धरेल, असे उपहासाने बोलणारे काही लोक आता अमरच्या चिकाटीसह जिद्द मेहनतीची तसेच प्रायोगिक शेतीची प्रशंसा करू लागले आहेत.**

# ऑस्ट्रेलियाचाही पहिला डाव गडगडला

## सिडनी कसोटीत भारताकडे १४२ धावांची आघाडी



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऋषभ पंतच्या स्फोटक अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने दुसऱ्या दिवसाअखेर धावफलकावर ६ बाद १४१ धावा लावल्या आहेत. पहिल्या डावातील चार धावांच्या अल्प आघाडीसह सिडनी कसोटी सामन्यात टीम इंडियाने १४२ धावांची आघाडी घेतली आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला त्या वेळी रवींद्र जडेजा ८ (३९) आणि वॉशिंग्टन सुंदर ६ (१७) ही जोडी मैदानात होती.

ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १८१ धावांवर आटोपल्यावर टीम इंडियाने आपल्या दुसऱ्या डावाची सुरुवात केली. आक्रमक अंदाजात बॅटिंग करत यशस्वी जैस्वालने संघाला दमदार सुरुवात करून दिली. दुसऱ्या बाजूला लोकेश राहुलही संयमी अंदाजात खेळताना दिसला, पण बोलँडने ही सेट झालेली जोडी फोडत टीम इंडियाला पहिला धक्का दिला. तो आक्रमक अंदाजात खेळण्याच्या नादात राहुल बाद झाला. त्याने १३ चेंडूत २० धावा केल्या. यशस्वीच्या रुपात टीम इंडियाने आपली दुसरी विकेट गमावली. त्याने ३५ चेंडूत २२ धावा केल्या, ज्यात चार चौकाराचा समावेश होता.

सलामी जोडी तंबूत परतल्यावर शुबमन गिल आणि विराट कोहलीकडून मोठ्या अपेक्षा होत्या, पण या दोघांनाही मैदानात तग धरता आला नाही. विराट पुन्हा एकदा ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर फसला. पहिल्या तिन्ही विकेट्स बोलँडच्या खात्यात जमा झाल्या. गिलच्या रूपात बो वेब्स्टरने कसोटी कारकिर्दीतील आपले पहिले यश मिळवले. गिल १५ चेंडूत दोन चौकाराच्या मदतीने १३ धावांवर बाद झाला. ७८ धावांवर टीम इंडियाने चार विकेट्स गमावल्या होत्या.

यानंतर मैदानात उतरलेल्या ऋषभ पंतने तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश केला. त्याने रवींद्र जडेजासोबत पाचव्या विकेटसाठी ४६ धावांची भागादारी रचली. पॅट कमिन्सने सेट झालेल्या आणि स्फोटक अंदाजात खेळणाऱ्या पंतला तंबूचा रस्ता दाखवला. त्याने ३३ चेंडूत सहा चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ६१ धावांची खेळी केली. पंतची विकेट पडल्यावर नितीशकुमार रेड्डीकडून अपेक्षा होती, पण तो २१ चेंडूत चार धावा करून बोलँडच्या गोलंदाजीवर बाद झाला.

अजूनही टीम इंडियाच्या हातात चार विकेट्स आहेत. हे चार फलंदाज अधिकाधिक धावा करून ऑस्ट्रेलियासमोर कठीण आव्हान देण्यासाठी प्रयत्नशील असतील. तिसऱ्या दिवशी भारतीय संघ किती धावा करणार ते पाहण्याजोगे असेल.

# के.पी. वॉरियर्स खोपोली संघ विजेता

## स्व. अर्चना प्रभाकर राणे स्मृतिचषक स्पर्धा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अभिजीत राणे क्रिकेट क्लब थळेपाडा आयोजित स्व. अर्चना प्रभाकर राणे स्मृतिचषक टी-२० लेदर स्पर्धेची सांगता झाली. २२ डिसेंबरला सुरू झालेल्या या स्पर्धेत १६ संघांनी भाग घेतला होता. यामध्ये अव्वल दर्जाचा खेळ करत अजिंक्य राहून खोपोली संघाने प्रथम क्रमांक पटकावला.



यजमान संघाने द्वितीय, अजिंक्य डेव्हलपर पुरस्कृत अलिबाग क्रिकेट अकादमी तृतीय, तर नागेश्वर आवास संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. याशिवाय खोपोलीचा निकुंज विठलानी उत्कृष्ट फलंदाज, थळेपाडाचा निकेश थळे उत्कृष्ट गोलंदाज आणि अष्टपैलू खेळ करत खोपोलीचा आर्यन देशमुख मालिकावीर ठरला. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पहिला सामना रायगड विरुद्ध खोपोली या दोन महिला संघांमध्ये खेळवला गेला. दोन्ही संघातील महिला खेळाडूंना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.

# राष्ट्रीय रायफल चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मयुरी पवारला आठ पदके

**पनवेल : वार्ताहर**



मध्य प्रदेशातील भोपाळ येथे झालेल्या ६७व्या राष्ट्रीय रायफल चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या लक्ष्य शूटिंग क्लबची खेळाडू व पिल्ले कॉलेज येथे एफवायबीकॉममध्ये शिकणारी मयुरी लक्ष्मण पवार हिने विविध प्रकारात एकूण आठ पदके पटकाविली आहेत.

यामध्ये प्रामुख्याने आयएसएसएफ युथ प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक, आयएसएसएफ ज्युनिअरमध्ये वैयक्तिक रौप्य, मिक्स्ड टीम प्रकारात कांस्य, युथ महिला टीमचे सुवर्ण, ज्युनिअर महिला टीमचे सुवर्ण, सीनियर महिला टीमचे सुवर्ण, सिव्हिलियन सीनियर महिला टीमचे सुवर्ण, सिव्हिलियन ज्युनियर महिला टीमचे सुवर्ण अशी सहा सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले. मयुरीला मुख्य प्रशिक्षक सुमा शिरूर तसेच स्मिता कांबळे व रमेश माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

# माणगावच्या श्रद्धा स्कूलचे वार्षिक क्रीडा संमेलन



**माणगाव : बातमीदार**

श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलच्या वार्षिक क्रीडा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याचा शुभारंभ शाळेच्या मैदानात विविध क्षेत्रातील मान्यवर अतिथी, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाला.

प्रमुख पाहुणे अर्थात याच शाळेतील विद्यार्थी रेडियोलॉजिस्ट डॉ. अनिकेत उभारे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. या वेळी डॉ. आरिफ पागारकर, पत्रकार रवी कुवेसकर, शिक्षक तिलक खाडे, संजय गमरे, आर.के. म्हात्रे, संजय निजापकर यांचे शाळेच्या संस्थापक अध्यक्ष बिजाक्षी राय-हेगडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालेय विद्यार्थिनींनी करून उपस्थितांचे आभारही मानले.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com